| धाराशिव | वर्ष २५ वे | अंक १९३ वा | शनिवार दिनांक ११ ऑक्टोबर, २०२५ | पृष्ठे ६ | किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)

प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)

पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com

संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### सोयाबिनचे पन्नास कट्टे गेले चोरली

धाराशिव (प्रतिनिधी)- तुळजापूर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी बालवीर बलभिम पाटील, वय ७० वर्षे, रा. चिंचोली ता.तुळजापूर जि. धाराशिव यांचे चिंचोली शिवारातील शेतातील सोयाबीनचे ५० कट्टे ५५ क्विंटल एकुण ७५,००० किंमतीचे अज्ञात व्यक्तीने दि.०८.१०.२०२५ रोजी २३.०० ते दि.०९.१०.२०२५ रोजी ०५.०० चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-बालवीर पाटील यांनी दि.०९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### पोलिसांची अवैध मद्य विरोधी कारवाई

धाराशिव (प्रतिनिधी)- स्थानिक गुन्हे शाखाअंतर्गत पोलिसाकडून समजलेली माहिती अशी की, गुड्डी रा.पापनाश नगर साठे चौक जुना बस डेपो दुध डेअरी जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव या दि.०९.१०.२०२५ रोजी राहत्या घराचे बाजूस अंदाजे १०,३०० किंमतीची ३५ लिटर गावठी दारु व १५० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. सोमा रा. पापनाश नगर साठे चौक जुना बस डेपो दुध डेअरी जवळ धाराशिव ता. जि. धाराशिव हे दि.०९.१०.२०२५ रोजी आपल्या राहत्या घराचे बाजूस अंदाजे १४,५५० किंमतीची ३० लिटर गावठी दारु व १९५ लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. छाया रा. मस्सा खं. ता.कळंब जि. धाराशिव या दि.०९.१०.२०२५ रोजी मस्सा ते अंदोरा गावात जाणारे रोडलगत आपल्या राहत्या घरासमोर अंदाजे २४,००० किंमतीची ८० लिटर गावठी दारु व २०० लिटर गावठी दारु निर्मीतीचे गुळमिश्रीत रासायनिक द्रव अवैध विक्रीच्या उद्देशाने जवळ बाळगलेले जप्त करण्यात आले. यावरुन पोलीसांनी अवैध मद्य जप्त करुन नमूद व्यक्तीविरुध्द महाराष्ट्र मद्य मनाई कायदा कलम-६५(ई) अन्वये धाराशिव शहर व कळंब पो ठाणे येथे स्वतंत्र ३ गुन्हे नोंदविले आहेत.

### लातूरातून मोटारसायकलची चोरी: गुन्हा तुळजापूरात दाखल

तुळजापूर(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गम फिर्यादी राजेंद्र काशिनाथ मगर, वय ५४ वर्षे, रा. वाघोली ता. जि. धाराशिव यांची ५०,००० किंमतीची मोटरसायकल ही दि.०६.१०.२०२५ रोज रोजी विश्वनाथ कॉर्नर लातुर रोडलगत भवानी मोबाईल शॉपी समोरुन अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे- राजेंद्र मगर यांनी दि.०९.१०.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन तुळजापूर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

## मानसिक आरोग्य आणि समुपदेशन कौशल्य विकासासाठी टीसचा स्तुत्य उपक्रम-जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार



धाराशिव दि.१० ऑक्टोबर (जिमाका) जागतिक मानसिक आरोग्य दिनानिमित्त टाटा सामाजिक विज्ञान संस्था (ढखडड), तुळजापूर कॅम्पसच्या वतीने मानसिक आरोग्य आणि समुपदेशन कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रमआज आयोजित करण्यात आला.या प्रशिक्षणामध्ये तुळजापूर तालुक्यातील ग्रामसेवक, तलाठी तसेच स्वयंसेवी संस्थांचे प्रतिनिधी सहभागी झाले.

प्रशिक्षण कार्यक्रमाचे उद्घाटन जिल्हाधिकारी किर्ती किरण पुजार यांच्या हस्ते झाले.अध्यक्षस्थानी प्रो.रमेश जारे (टिस कॅम्पस संचालक, तुळजापूर) होते.प्रमुख अतिथी म्हणून डॉ.मैनाक घोष (मुख्य कार्यकारी अधिकारी,जि.प. धाराशिव),डॉ.सतीश हरिदास (जिल्हा आरोग्य अधिकारी),श्री. अरविंद बोळंगे (तहसिलदार, तुळजापूर), श्री.हेमंत भिंगारदिवे (गट विकास अधिकारी) यांच्यासह ढखडडचे तज्ञ, समाजसेवक व विविध संस्थांचे प्रतिनिधी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी श्री.पुजार म्हणाले की, मानसिक आरोग्य हा आजच्या काळातील सर्वात संवेदनशील आणि महत्त्वाचा विषय आहे.विशेषतः अलीकडील अतिवृष्टी व पुरस्थितीमुळे शेतकऱ्यांवर आलेल्या ताण-तणावाच्या पार्श्वभूमीवर ढखडड तुळजापूरचा हा उपक्रम काळाच्या गरजेला साजेसा आहे,असे त्यांनी सांगितले.

श्री.पुजार पुढे म्हणाले की, ग्रामपातळीवर मानसिक आरोग्याविषयी जागरूकता आणि समुपदेशन कौशल्ये विकसित झाली तर शेतकऱ्यांचा मानसिक आधार दृढ होईल आणि आत्महत्यांचे प्रमाण घटेल.

प्रो.बाळ राक्षसे यांनी मानसिक आरोग्य हा सामाजिक विकासाचा अविभाज्य घटक असल्याचे नमूद केले.डॉ.सतीश हरिदास म्हणाले की, समुपदेशन कौशल्यांचा विकास म्हणजे समाजात शाश्वत गुंतवणूक आहे.प्रो.रमेश जारे यांनी आपत्तीच्या काळात समाजाशी भावनिक एकात्मता साधणे गरजेचे असल्याचे सांगितले. डॉ.संपत काळे यांनी मनाचे आरोग्य हीच खरी समृद्धी हा संदेश दिला.गट विकास अधिकारी हेमंत भिंगारदिवे यांनी या उपक्रमाला 'मुख्यमंत्री समृद्ध पंचायतीराज अभियान'शी सुसंगत असल्याचे नमूद केले.

संसाधन व्यक्तींमध्ये मेधा काळे यांनी नैसर्गिक आपत्ती आणि मानसिक आरोग्य, सुमिता भद्रिगे यांनी आपत्ती व्यवस्थापनातील समुपदेशन,तर निशिकांत कांबळे यांनी समुदाय मानसिक आरोग्य आणि संवाद कौशल्ये या विषयांवर मार्गदर्शन केले.

आभार श्री.देविदास कदम यांनी मानले.कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री.शंकर ठाकरे आणि ढखडड टीमने विशेष परिश्रम घेतले.हा अभिनव उपक्रम जिल्ह्यातील पूरग्रस्त शेतकऱ्यांना मानसिक आधार देण्यासाठी तसेच ग्रामपातळीवर संवेदनशील व सक्षम नेतृत्व तयार करण्यासाठी मोलाचा ठरणार आहे.

## नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना मदत मिळावी या भावनेने काम करा - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर



धाराशिव (प्रतिनिधी)- ऑगस्ट सप्टेंबर महिण्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे धाराशिव जिल्हयात मोठया प्रमाणात नुकसान झाले असून झालेल्या नुकसानीचा आढावा घेणेकरीता खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी जिल्हाधिकारी कार्यालय, धाराशिव येथे बैठकीचे आयोजन केले होते. या बैठकीस आ. कैलास पाटील, आ. प्रविण स्वामी, जिल्हाधिकारी, किर्तीकुमार पुजार, मुख्यकार्यकारी अधिकारी मैनक घोष, निवासी उपजिल्हाधिकारी शोभा जाधव यांच्यासह अन्य अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत आढावा घेण्यात आला.

जिल्हयातील रस्ते, पुल व पुलकम बंधाऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाल्याने शासनाकडे सदर रस्ते पुल व पुलकम बंधारे दुरुस्ती करणेबाबत प्रस्ताव पाठवून तात्काळ दुरुस्त करणेबाबत सुचना करण्यात आल्या.

जिल्हयातील विविध ठिकाणी विद्युत पुरवठा अतिवृष्टीमुळे व पुर परिस्थितीमुळे खंडीत झाल्या कारणाने मोठया प्रमाणात देखभाल दुरुस्ती करणे गरजेचे होते. ११ के.व्ही. लाईन व अन्य कामे तात्काळ सुरु करणेबाबत तसेच भुम तालुक्यातील शिराळा सबस्टेशन व अंतरगाव सबस्टेशन जे की, पुराचे पाणी पुर्णत: बुडाले होते. ते तात्काळ सुरु करणेबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच जिल्हाभरातील विद्युत वाहक पोल अतिवृष्टीमुळे पडले असल्याने शेतकऱ्यांचा व बऱ्याच गावांचा विद्युत पुरवठा खंडीत झाला होता. तो सुरळीत करणेबाबत सुचना देण्यात आल्या. तसेच २० दिवस मुदतीच्या आत विद्युत वितरण प्रणालीची कामे पुर्ण करुन सुरळीत विद्युत पुरवठा करावा व रब्बी हंगाम दृष्टी क्षेपात असून या हंगामामध्ये शेतकऱ्यांकडून मोठया प्रमाणात विद्युत मागणी वाढणार असल्याचे लक्षात घेवून शेतकऱ्यांना हंगामामध्ये सुरळीत विज पुरवठा करणेबाबत सक्त सुचना खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्याकडून देण्यात आल्या. तसेच जिल्हयातील फिडर सेफरेशन जानेवारीपर्यंत पुर्ण करण्याची ताकीद देण्यात आली. जिल्हयात सरासरीपेक्षा जास्त पाऊस झाला असून सर्वत्र जिल्हयात अतिवृष्टी झाली आहे. ६५ मि.मी पेक्षा १३८ दिवस पाऊस झाल्याने शेतीपिकाचे मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. तसेच जिल्हयातील ५ लाख ७२ हजार हेक्टर क्षेत्रापैकी ९३ टक्के क्षेत्र बाधीत असून २ हेक्टर क्षेत्राऐवजी शासन निर्णयानुसार ३ हेक्टर मर्यादेपर्यंत शेतकऱ्यांना मदत करावी. याचबरोबर शेतकऱ्यांच्या पशुधनाची हानी झाली असून शेतकऱ्यांच्या पशुधनाचे भरपाई देताना पोस्ट मॉर्टम वाहून गेल्यामुळे शक्य नसल्याने स्थळपंचनामा ग्राहय धरुन शेतकऱ्यांना मदत करावी. शेतकऱ्यांच्या विहीरीमध्ये गाळ गेल्याने त्या दुरुस्त करणेकरीता रोहयो मधून ३० हजार रुपये पर्यंत मदत देवून एकही अतिवृष्टीग्रस्त शेतकरी वंचीत राहणार नाही याची दक्षता घ्यावी अशा सुचना दिल्या. तसेच फळबागांचे पंचनामे करुन शेतकऱ्यांना यथायोग्य मदत करणेबाबत सुचीत करण्यात आले. जिल्हयात पिक कापणीचे प्रयोग सुरु असून उंबरठा उत्पन्न व जोखीम पाहून पिक विमा मंजुर करण्यात येणार असल्याने खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर व आ. कैलास पाटील यांनी वास्तविक पिक कापणी प्रयोग करावे. काही ठिकाणी चुकीच्या पध्दतीने कापणी प्रयोग झाल्याने शेतकरी पिक विम्यापासून वंचीत राहण्याची शक्यता निर्माण झाल्याने संबंधीत अधिकाऱ्यांनी पिक कापणी प्रयोगातील वास्तविक उंबरठा उत्पन्न शासनास कळवावे अशा स्पष्ट सुचना कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना व पिक विमा योजनेच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्या.

ज्या घरांमध्ये पुराचे पाणी जावून पडझड झाली आहे अथवा सततच्या पाऊसामुळे घरांच्या भिंती फुगुन धोकादायक स्थितीत आहेत त्यांचे पंचनामे करावेत.

अनेक ठिकाणी तलाव ओव्हरफ्लो झाल्याने नदीकाठच्या गावांना धोका निर्माण झाला होता. असे तलावांचे सांडवे फोडुन पाणी निर्गमीत करण्यात आले होते. ते सांडवे तात्काळ दुरुस्त करण्यात यावेत. तसेच रस्त्यावरील पुल वाहून गेल्याने अनेक ठिकाणी वाहतुकीस अडथळे निर्माण होत असून अशा ठिकाणी तात्काळ दुरुस्ती करुन सदर नादुरुस्त ठिकाणी वाहतुक योग्य करण्याबाबत सुचना देण्यात आल्या. यावेळी संबंधीत सर्व विभागांचे अधिकारी उपस्थित होते. तसेच नागरीकही मोठया प्रमाणात उपस्थित होते.

## पिंजरा सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्राचा परवाना रद्द : नियमभंग केल्याने प्रशासनाची कारवाई

धाराशिव (जिमाका) धाराशिव तालुक्यातील आळणी येथील गट. नंबर ३३३ येथे अर्जदार श्री.बाबासाहेब राजाभाऊ गाठे यांना मिळालेल्या पिंजरा सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्र या नावाने लोकनाट्य कला केंद्र चालविण्यास दिलेल्या परवान्याबाबत प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे.या परवानाधारकाने कार्यक्षेत्रातील अटी व नियमांचे उल्लंघन केल्याचे निदर्शनास आल्याने परवाना तत्काळ रद्द करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी श्री.किर्ती किरण पुजार यांच्या आदेशान्वये ही कारवाई करण्यात आली.

पूर्वी दिलेल्या आदेशानुसार पिंजरा सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्राला लोकनाट्य कला सादरीकरण, कार्यक्रमांची अनुमती,सार्वजनिक मनोरंजन कार्यक्रम आदींसाठी अटी व शर्ती घालून परवाना देण्यात आला होता.मात्र,परवान्यातील अटींचे उल्लंघन झाल्याने धाराशिव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.गुन्हा क्र. १९२/२०२५ व कलम २२३ भारतीय न्याय संहिता २०२३ अन्वये गुन्हा दाखल झालेला आहे.

या कलानाट्य केंद्राच्या संचालकाने परवाना मिळालेल्या अटींचे पालन न करता बेकायदेशीर कृत्ये केल्याचे स्थानिक गुन्हे शाखेच्या तपासणीत आढळून आले.त्यामुळे पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांनी जिल्हाधिकारी यांना अहवाल सादर केला होता.या अहवालाच्या आधारे नियम क्र.२२६ (ळळ) अन्वये सदर परवाना रद्द करण्याचा निर्णय घेण्यात आला. त्यामुळे पिंजरा सांस्कृतिक लोकनाट्य कला केंद्र (आकोळी,ता. धाराशिव) यांचा परवाना आता रद्द झाला असून पुढील काळात कोणत्याही परिस्थितीत या केंद्राला परवाना देण्यात येणार नाही,असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

## तुळजापूरमध्ये बनावट खत निर्मितीवर कृषि विभागाची धडक कारवाई

धाराशिव (जिमाका)- शेतकऱ्यांच्या हिताचे रक्षण करण्यासाठी कृषि विभाग सतत निविष्ठा उत्पादक व विक्रेत्यांवर लक्ष ठेवून आहे.या अनुषंगाने तुळजापूर तालुक्यातील मौजे तामलवाडी येथे तेरणा व्हॅली फर्टीलायझर अँण्ड केमिकल नावाने बनावट खत निर्मिती कारखाना सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर जिल्हास्तरीय भरारी पथकाने धडक तपासणी केली.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी श्री. महादेव आसलकर यांच्या आदेशानुसार भरारी पथकप्रमुख श्री. एन.एम.पाटील (कृषी विकास अधिकारी,जि.प.धाराशिव) यांच्या नेतृत्वाखाली श्री.प्रविण पाटील,श्री. व्ही.एम.भुतेकर,श्री.डी.व्ही.मुळे,श्री. आबासाहेब देशमुख,श्री.दीपक गरगडे, श्री.जी. पी.बनसोडे आदी अधिकाऱ्यांनी संयुक्त कारवाई केली.तपासणीत गंभीर अनियमितता आढळून आल्याने सविस्तर अहवाल जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात आला.त्यानंतर कृषि आयुक्तालयातील परवाना अधिकारी तथा कृषि संचालक (नि.व.गु.नि.) यांच्यासमोर सुनावणी घेण्यात आली.

सुनावणीनंतर तेरणा व्हॅली फर्टीलायझर अँण्ड केमिकल या कंपनीचा खत निर्मिती परवाना तसेच खत विक्री परवाना सहा महिन्यांसाठी निलंबित करण्यात आला. यापुढेही अशा कारखान्यांवर व विक्रेत्यांवर तपासणी सुरू राहणार असून,दोषी आढळल्यास बियाणे/खते/किटकनाशके कायद्याअंतर्गत कठोर कारवाई केली जाईल,असा इशारा कृषी विभागाने दिला आहे.

जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी शेतकऱ्यांना आवाहन केले आहे की त्यांनी खते,बियाणे व कीटकनाशके खरेदी करताना फक्त अधिकृत परवानाधारक कृषि सेवा केंद्रातूनच खरेदी करावी.खरेदीवेळी पक्की पावती,ई-पॉस मशीनचे बिल आणि खताच्या बॅगवरील किंमतीशी ताळमेळ तपासावा.

बियाण्यांची पिशवी सिलबंद असल्याची खात्री करावी व अंतिम मुदत पाहून घ्यावी. खरेदी केलेल्या बियाण्याचे टॅग,पिशवी व थोडा नमुना हंगाम संपेपर्यंत जतन करून ठेवावा.शेतकऱ्यांच्या हिताला धक्का लावणाऱ्या कोणत्याही बनावट व बेकायदेशीर कृत्यांवर विभागाकडून कठोर कारवाई सुरूच राहील,असेही प्रभारी अधिक्षक कृषि अधिकारी एम.के. आसलकर यांनी सांगितले.

## १३ ऑक्टोबरला जाहीर सोडत: धाराशिव तालुका : पंचायत समिती व सदस्य पदांचे आरक्षण, प्रक्रियेसाठी नागरिकांना आमंत्रण

धाराशिव दि.१० ऑक्टोबर(जिमाका) धाराशिव तालुक्यातील पंचायत समिती सदस्य पदांचे आरक्षण सोडतीद्वारे जाहीर करण्यात येणार आहे.यासाठीची सोडत प्रक्रिया १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजता जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील जिल्हा नियोजन समिती सभागृहात पार पडणार आहे.

ही सोडत महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम,१९६१ मधील तरतुदीनुसार तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषदा आणि पंचायत समित्या (जागांच्या आरक्षणाची पद्धत व चक्रानुक्रम) नियम,२०२५ अंतर्गत घेण्यात येणार आहे.या सोडतीत अनुसूचित जाती,अनुसूचित जमाती,नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग व त्यामधील स्त्रियांसाठी तसेच सर्वसाधारण स्त्रियांसाठी राखीव जागा निश्चित केल्या जाणार आहेत.

या संदर्भात तहसीलदार धाराशिव तथा सहायक मतदार नोंदणी अधिकारी डॉ.मृणाल जाधव यांनी माहिती दिली. त्यांनी सांगितले की,पंचायत समिती क्षेत्रातील ज्यांना सोडत प्रक्रियेस उपस्थित राहायचे आहे,त्यांनी नियोजित दिवशी व वेळेस सभागृहात उपस्थित राहावे.

## त्रिवेणा सिरसाठ यांचे निधन



धाराशिव - धाराशिव शहरातील भीम नगर येथील रहिवासी त्रिवेणा काका सिरसाठ (वय ७८) यांचे अल्पशा आजाराने गुरुवार १० ऑक्टोबर २०२५ रोजी निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर शुक्रवारी धाराशिव येथील स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात मुले, मुली, सुना ,नातवंडे असा परिवार आहे. भारतीय सैन्य दलातील नायब सुभेदार अनुपकुमार सिरसाठ यांच्या त्या आई होत.


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## विचाराचा अभावामुळे कर्जबाजारी

भारतीयांनी आता विचार करावा की, जागतिक बँकेचे भारतावरील एकूण कर्ज ३९.२८ अब्ज अमेरिकन डॉलर इतके झाले आहे, वरचेवर कर्ज घेत राहीलो व खर्चात कपात नाही केल्यास आगामी काळात मोठे आर्थिक संकट निर्माण होणार आहे. त्यामुळे भारतीयांनी विचार केला पाहिजे. भारतीयांनी विचार करून चालले पाहिजे. एकीकडे विकास साधला पाहिजे तर दुसरीकडे देश चालला पाहिजे. त्यात भारतीय नागरिक काटकसरीने जीवन जगत नाहीत. वाट्टेलतसा खर्च करीत असतात. त्यात भारतीयांनी केवळ सरकारला आडचणीत आणून आर्थिक लुट करणे योग्य नाही. सध्याला विचार करायाला लावणाऱ्या बाबी अनेक आहेत. विशेष करून लोकप्रतिनिधीनी या बाबत विचार केला पाहिजे. सध्याला देशात वेगाने विकासाची कामे होत आहेत. विकास साधला जात आहे तर दुसरीकडे पगारी मोठ्या प्रमाणात केल्या जातत. सॅलरीस लागणारा पैसा हा कर्ज काढून होत असेल तर ते योग्य नाही. सरकारने स्थिर उत्पन्न निर्माण केले पाहिजे. पर्याटनाच्या माध्यमातून उत्पन्न मिळविता येते. भारतात अनेक पर्याटन क्षेत्र आहेत त्याचा विकास साधला पाहिजे. गड, किल्ले, निसर्गरम्य ठिकाण, डोंगराळ भाग, इतिहासिक ठिकाणे, शौर्य गाजविलेले ठिकाण असे अनेक ठिकाण आहेत. त्याचा विकास साधुन पर्याटनाच्या माध्यामातून आर्थिक मसुलातवाढ करता येवू शकते. सध्याला चैनीच्या वस्तूवर अधिक कर लावुन, जसे दारू, सिगारेट आदि बाबीकर अधिक कर लावुन महसुली उत्पादन वाढविले जात आहे. आलिकडे मद्यावर अधिक कर लावला गेला आहे. मुळात किती कर लावणार? याला मर्यादा येतात, त्याला पर्याय शोधला पाहिजे. वरचेवर देशावर कर्जाचा डोंगर वाढत आहे. अशा स्थितीत एक काळ असा येतो की, कर्ज फेडणे अशक्य होते. त्यामुळे पुढे काय होते हे सुज्ञमंडळींना चांगणे नको. त्यामुळे आता विचारपुर्वक सर्वांनी वागले पाहिजे. आज भरमसाठ खर्च वायपट केला जातो. अनेकांना चारचाकी गाड्या वाटल्या जात आहेत. कार्यालयीन व त्यांच्या जो खर्च सरकार करीत आहे या बाबत विचार केला पाहिजे. विद्युतचा वापर अमाप केला जातो. इंधनाचा वापर खाजगी कामा साठी केला जात असेल तर ते योग्य नाही. प्रत्येक भारतीयांच्या डोक्यावर खर्चाचा आकडा हा विचार करायाला लावणारा आहे. त्यामुळे आता पासून विचार करून काटकसरीने वागले पाहिजे. विशेष करून सरकारने वेळीच सावध झाले पाहिजे. जो जागतिक आवाहल प्रसिद्ध झाला आहे तोच विचार करायाला लावणारा आहे. सन २०१४ पर्यंत भारतावरील कर्ज ते जीडीपी हे गुणोत्तर ५५ ते ५७% इतके होते ते आता ८३% च्या पुढे गेले आहे. ही सकृतदर्शनी चिंताजनक बाब आहे हे खरे; पण जगातल्या अन्य देशांचा विचार केला तर भारताचे हे कर्जाचे प्रमाण फार चिंता करावी असे नाही. जपानसारख्या देशावर त्यांच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नाच्या तुलनेत २६०% इतके कर्ज आहे. हेच गुणोत्तर इटलीच्या बाबतीत १४०% अमेरिकेच्या बाबतीत १२१% आणि फ्रान्सच्या बाबतीत ११८% इतके आहे. त्यामुळे भारताचे सध्याचे कर्ज ते जीडीपी हे गुणोत्तर अर्थतज्ज्ञांनुसार सुरक्षित स्वरूपाचे मानले जाते. अर्थात, हे जरी खरे असले तरी भारताचे सातत्याने वाढत जाणारे कर्जाचे प्रमाण चिंतेची बाब आहे हे देखील काही अर्थतज्ज्ञ नमूद करताना दिसतात. जागतिक बँकेचे भारतावरील कर्ज वाढण्याची बाब एकाएकी समोर आल्यानंतर आता पुन्हा मोदी सरकारच्या एकूण आर्थिक व्यवस्थापनावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जाऊ लागले आहे. भारतावरचे कर्ज का वाढले याचा विचार केला तर देशाला विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणात कर्ज घ्यावे लागले असल्याचे कारण पुढे केले जाते. कोविड काळात देशाच्या तिजोरीवरील ताण मोठ्या प्रमाणात वाढला, त्याचे व्यवस्थापन करतानाही मोठी रक्कम खर्ची घातली गेली असेही कारण पुढे केले जात आहे. मात्र, कोविडनंतर ही परिस्थिती सुधारायला हवी होती; पण त्यात सुधारणा झालेली दिसत नाही हेही तितकेच खरे आहे. माहितीनुसार, जागतिक बँकेचे भारतावरील एकूण कर्ज ३९.२८ अब्ज अमेरिकन डॉलर इतके झाले आहे, भारतीय रुपयात हे कर्ज अंदाजे सुमारे ३४ लाख कोटी रुपये इतके असल्याचे सांगितले जाते. सन २०२५ च्या ताज्या रिपोर्टमध्ये ही आकडेवारी प्रसारित झाली आहे. भारतावर सध्या एकूण बाह्य कर्ज ७१७.९ अब्ज डॉलर इतके आहे. देशावरीत बाह्य कर्ज ते देशाचे सकल राष्ट्रीय उत्पन्न याचे गुणोत्तर १८.९% इतके आहे. हे काही आताच थोड्याच दिवसात कर्जाचा डोंगर वाढला आहे असे समजू नये. पन्नास वर्षापासूनचा विचार केला तर मोदी यांच्या पुर्वीच्या सरकारने विचार न करता कर्ज घेतले आहे. कर्जाचा योग्य विनियोग लावला तरच नुकसानीचे ठरत नाही. अविचाराने चालल्याचा हा परिणाम दिसून येत आहे. त्यामुळे यापुढे तरी विचारपुर्वक चालले पाहिजे. अविचाराने असेच वागल तर आर्थिक फटका मोठ्या प्रमाणात बसणार आहे. मुळात अजून ही भारतीय देशाचे आर्थिक उत्पन्न म्हणजे महसुलात वाढ करण्याचा विचार केला जात नाही. भारत असा जगात देश आहे की, येथे तीन समसमान असे ऋतू आहे. वातावरण चांगले आहे. काही देशात सहा महिणे उन्हाचा तडका व सहा महिणे पाऊस अशी स्थिती आहे. भारताने आता विचारपुर्वक पावले उचलली पाहिजेत. महसुलात कशा प्रकारे वाढ करता येईल या बाबत तज्ज्ञाची समिती तयार करून देशातचे आर्थिक स्त्रोत कशाने वाढेल याचे नियोजन करून खर्च व आर्थिक महसुलात वाढीतून खर्च हा मेळ घातला पाहिजे. जो पर्यंत नियोजन करणार नाहीत. जो पर्यंत आर्थिक उत्पन्न व खर्चाचा तालमेल घातला जाणार नाही तो पर्यंत असे कर्जाचा व कर्जावरील व्याजाचा डोंगर वाढतच जाणार आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीयांनी विचार करून चालले पाहिजे तरच हे आर्थिक संकट दूर करता येवू शकेल. नसता एक ना एक दिवस वाईट आल्याशिवाय राहाणार नाही. जगात भारत हा मोठा कर्जदार देश बनत आहे ही मोठी चिंतेची बाब आहे.

# गतिमान प्रशासनाचे नवे प्रतिमान: ई-ऑफिस



कधी काळी सरकारी कार्यालयात पाऊल टाकलं की सर्वप्रथम नजरेत भरायचे ते म्हणजे टेबलांवर रचलेले फाईलींचे डोंगर. धूळ, उघडी पानं, आणि त्या सगळ्यांच्या गर्दीत हरवलेले अर्ज हे दृश्य भारतीय प्रशासनाची ओळख बनले होते. ''फाईल अजून आली नाही'', ''सही बाकी आहे'', ''प्रकरण मंत्रालयात आहे'' अशी उत्तरं नागरिकांनी वर्षानुवर्षे ऐकली. शासनाकडे केवळ हक्कासाठी नव्हे, तर आपली फाईल 'अडकू नये' म्हणूनच लोकांना फेऱ्या माराव्या लागत. या सगळ्याचं कारण साधं होतं, शासनाची प्रणाली पूर्णपणे कागदांवर चालायची. फाईल हातोहात फिरवली जायची. ती कुठे हरवली, कोणाकडे अडकली हे शोधणं म्हणजे गवताच्या गंजीत सुई शोधण्यासारखं काम होतं. परंतु, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या चाणाक्ष नजरेने ही बाब हेरली आणि १५० दिवसांच्या प्रशासकीय सुधारणांच्या कामात प्रत्येक विभाग आणि कार्यालयाला ई-ऑफिस प्रणालीवर येणे अनिवार्य केले. बघता बघता नंदुरबार सारख्या आदिवासी बहुल जिल्ह्यात एक नाही तर तब्बल ३४ कार्यालये आजतागायत ई-ऑफिस प्रणालीवर आली आहेत.

### ई-ऑफिसचा जन्म

२००० च्या दशकात सरकारने ठरवलं की बदल आवश्यक आहे. देश माहिती तंत्रज्ञानाच्या युगात प्रवेश करत होता. तेव्हा 'ई-गव्हर्नन्स' ही संकल्पना पुढे आली. शासनाच्या प्रत्येक कामकाजात डिजिटल तंत्रज्ञान आणण्याचा प्रयत्न सुरु झाला. राष्ट्रीय माहिती केंद्राने या संकल्पनेला प्रत्यक्ष रूप दिलं आणि ई-ऑफिस प्रणाली विकसित केली. कल्पना साधी पण क्रांतिकारक होती-कागदाऐवजी संगणक, हस्ताक्षराऐवजी डिजिटल सही, आणि फाईलऐवजी ऑनलाईन व्यवस्थापन. या प्रणालीत प्रत्येक अर्ज, पत्र किंवा प्रस्ताव डिजिटल स्वरूपात तयार होतो. त्यावर अधिकाऱ्यांची टिपणी, आदेश आणि निर्णय थेट ऑनलाइन नोंदवले जातात. ''फाईल कुठे आहे?'' हा प्रश्न कायमचा संपतो.

### बदलाची पहिली पाऊले

सुरुवातीला सर्व काही सोपं नव्हतं. अनेक कर्मचाऱ्यांना संगणकाची सवय नव्हती. की-बोर्डवर टायपिंग करणे अवघड वाटत होते. कागदावर काम करण्याची मानसिकता खोलवर रुजलेली होती. पण जसजसा अनुभव वाढला, तसतसे वातावरण बदलू लागले. पहिल्या काही फाईली वेळेत पूर्ण झाल्या, काही अर्ज अपेक्षेपेक्षा जलद मंजूर झाले. लोकांना जाणवलं की ई-ऑफिस ही केवळ तांत्रिक प्रणाली नाही, तर कामकाजाच्या संस्कृतीतला बदल आहे. कागदावरील अवलंबित्व कमी झालं, खर्च घटला, आणि निर्णय प्रक्रियेला वेग आला. अधिकाऱ्यांना कामावर अधिक नियंत्रण मिळालं, आणि नागरिकांना वेळेवर प्रतिसाद मिळू लागला.

### नंदुरबारचा डिजिटल प्रवास

महाराष्ट्रातील नंदुरबार हा आदिवासीबहुल, डोंगराळ आणि दुर्गम जिल्हा. इथल्या नागरिकांसाठी प्रशासनाची दारे नेहमीच थोडी दूर वाटायची. अर्ज दिल्यानंतर तो पुढे गेला का, कुणाकडे गेला, मंजुरी कधी मिळेल हे समजणं अवघड असायचं. पण काही वर्षांपूर्वी जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी यांच्या पुढाकाराने जिल्ह्यात ई-ऑफिसची अंमलबजावणी झाली. प्रशिक्षण देण्यात आलं, नेटवर्क सुधारण्यात आलं, आणि प्रत्येक विभागाला या प्रणालीशी जोडण्यात आलं. आज जिल्हाधिकारी कार्यालयात आलेला अर्ज थेट संगणकावर नोंदवला जातो. त्याची स्कॅन प्रत प्रणालीवर अपलोड होते, संबंधित अधिकाऱ्यांकडे पाठवली जाते आणि त्याची स्थिती रिअल-टाईममध्ये दिसते. नागरिकाला अर्जाचा क्रमांक मिळतो, ज्याद्वारे तो ऑनलाईन त्याचा मागोवा घेऊ शकतो.

### एका शेतकऱ्याचा अनुभव

अक्कलकुवा तालुक्यातील रमेश पावरा हे छोटे शेतकरी त्यांना जमिनीच्या नोंदणीसाठी अर्ज करायचा होता. पूर्वी, ते अनेकदा तहसील कार्यालयात गेले, पण प्रत्येक वेळी नवीन कारण मिळायचं ''फाईल हरवली आहे'', ''सही बाकी आहे'', ''अजून पुढे गेली नाही.'' यंदा त्यांनी अर्ज दिला आणि तो ई-ऑफिसवर टाकला गेला. दोन दिवसांनी गावातील कॉमन सर्व्हिस सेंटरवरून त्यांनी लॉगिन करून पाहिलं, फाईल तहसीलदारांकडे पोहोचली होती. आणखी काही दिवसांत मंजुरीही मिळाली. त्यांच्या डोळ्यांत समाधान होतं. ते म्हणाले, ''पूर्वी माझा अर्ज लालफितीच्या डोंगरात अडकायचा, आता तो बुलेट ट्रेनच्या गतीने पुढे जातो.'' ही केवळ रमेशची यांची कथा नाही, ती नंदुरबारच्या नव्या गतिमान प्रशासनाची ओळख आहे.

### कामकाजातील बदल

ई-ऑफिसमुळे महसूल, आरोग्य आणि शिक्षण या तिन्ही प्रमुख विभागांत गती आली आहे. महसूल विभागात नामांतरण, वारसा आणि जमिनीच्या नोंदी आता काही दिवसांत पूर्ण होतात. पूर्वी हेच काम महिनोमहिने अडकायचं. जिल्हा सामान्य रुग्णालयातील औषध खरेदीचे प्रस्ताव, डॉक्टरांच्या नियुक्तीची कागदपत्रं आणि शासकीय पत्रव्यवहार सर्व आता ई-ऑफिसवरूनच प्रक्रिया होतात. मंजुरीसाठी लागणारा वेळ निम्म्यावर आला आहे. शिक्षण विभागात शाळांच्या दुरुस्तीचे प्रस्ताव, शिक्षक बदल्यांचे अर्ज, विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती सर्वकाही डिजिटल झालं आहे. शाळांना निधी वेळेत मिळतो आणि विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती विलंब न होता मिळते.

### दुर्गम भागातील डिजिटल पहाट

नंदुरबारचा भूगोल कठीण आहे. धडगाव, शहादा आणि अक्कलकुवा यांसारख्या तालुक्यांतील अनेक पाडे अजूनही डोंगरमाथ्यावर वसलेले आहेत. इथे वीजपुरवठा आणि नेटवर्क या दोन्ही अडचणी कायम आहेत. प्रशासनाने या अडचणींवर उपाय शोधत प्रत्येक कार्यालयाला ई-ऑफिसशी जोडण्याचं काम केलं. अधिकारी-कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण दिलं, तांत्रिक सुविधा निर्माण केल्या



आणि कर्मचारीवर्गाला बदलासाठी तयार केलं. आज डोंगराच्या पायथ्याशी राहणारा शेतकरी आपला अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात पोहोचताना पाहतो. त्याच्यासाठी हा केवळ तांत्रिक बदल नाही, तर लोकशाहीचा नवा अनुभव आहे.

### पारदर्शकता आणि जबाबदारी

ई-ऑफिसचं सर्वात मोठं यश म्हणजे पारदर्शकता. फाईल कुठे आहे, कोणाकडे आहे, किती दिवसांपासून आहे, हे सर्व प्रणालीवर स्पष्ट दिसतं. त्यामुळे जबाबदारी ठरते आणि भ्रष्टाचाराला आळा बसतो. पूर्वी फाईल हरवली की दोष ठरवणं कठीण होतं.आता प्रणाली स्वतःच नोंदी ठेवते. यामुळे प्रशासन अधिक जबाबदार आणि नागरिकांचा विश्वास अधिक दृढ झाला आहे. जिल्हा प्रशासनाने 'कागदविरहित कार्यालय' ही संकल्पना प्रत्यक्षात आणली आहे. कागदांचा वापर घटला आहे, छपाईचा खर्च कमी झाला आहे आणि पर्यावरणालाही फायदा झाला आहे.

### नागरिकांच्या जीवनातील बदल

ई-ऑफिसचा परिणाम केवळ कार्यालयांपुरता मर्यादित राहिला नाही, तो थेट नागरिकांच्या जीवनात दिसतो. पेन्शनधारक वृद्धांना त्यांचा अर्ज वेळेत मंजूर होतो. विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वेळेवर मिळते. शेतकऱ्यांना पिकविम्याचे पैसे योग्य वेळी मिळतात. ''फाईल हरवली'' हे वाक्य आता इतिहास झाले आहे. लोक हसून म्हणतात, ''फाईल पुढे गेली आहे.'' हा बदल शांत आहे, पण प्रभावी आहे.

### आव्हाने आणि शिकलेले धडे

ई-ऑफिसचा प्रवास सहज नव्हता. काही कर्मचाऱ्यांना नव्या प्रणालीबद्दल भीती वाटली. तांत्रिक त्रुटी आल्या, इंटरनेट मंद होतं, काही ठिकाणी वीज पुरवठा खंडित होत असे. पण, प्रशासनाने सातत्य आणि संयम ठेवला. कर्मचाऱ्यांना वारंवार प्रशिक्षण दिलं, अडचणी समजून घेतल्या आणि त्यावर एकत्रित उपाय शोधले. काही वर्षांतच सर्व कार्यालयांनी या प्रणालीला स्वीकारलं. या अनुभवाने दाखवून दिलं की इच्छाशक्ती असेल, तर कोणताही बदल शक्य आहे. आणि जेव्हा त्या बदलाच्या मागे नागरिकांचा विश्वास असतो, तेव्हा तो टिकून राहतो.

### नव्या युगाची सुरुवात

ई-ऑफिस ही फक्त प्रणाली नाही, ती शासन आणि नागरिक यांच्यातील दुवा आहे.ती वेळ वाचवते, खर्च कमी करते आणि सर्वात महत्त्वाचं म्हणजे विश्वास निर्माण करते. नंदुरबार जिल्ह्याने हा प्रयोग यशस्वीपणे राबवला आहे. आज प्रत्येक विभागात कामकाज गतीमान झालं आहे. अधिकाऱ्यांना निर्णय घेण्यासाठी आवश्यक माहिती सहज उपलब्ध होते. नागरिकांनाही आपल्या प्रकरणाची स्थिती जाणून घेणं सोपं झालं आहे. प्रशासन आता केवळ फाईलींचं नाही, तर लोकांच्या अपेक्षांचं प्रशासन बनलं आहे.

### ई-ऑफिसचा पुढचा अध्याय

ई-ऑफिसचा प्रवास फक्त नंदुरबारपुरता नाही. तो त्या महाराष्ट्राचा आरसा आहे जो हळूहळू कागदांवरून स्क्रीनवर जात आहे. राज्य सरकारने ''पेपरलेस सचिवालय'' हे ध्येय ठेवलं आहे, आणि जिल्ह्यांची कामगिरी त्या दिशेने आशादायक आहे. पुढील काही वर्षांत कृत्रिम बुद्धिमत्ता आणि डेटा विश्लेषण यांचा वापर ई-ऑफिसमध्ये वाढेल. फाईल फक्त डिजिटल न राहता स्मार्ट बनेल ती स्वतः पुढचा टप्पा ओळखेल, निर्णयप्रक्रियेत मदत करेल, आणि विलंब झाल्यास स्वयंचलित सूचना देईल. नंदुरबारसारख्या जिल्ह्यांनी या बदलाचं नेतृत्व केलं तर ग्रामीण भारताचं प्रशासनही डिजिटल युगात उभं राहील.

### नवी कार्यसंस्कृती

ई-ऑफिस ही केवळ सॉफ्टवेअर प्रणाली नाही, तर एक नवी कार्यसंस्कृती आहे जबाबदारी, पारदर्शकता आणि वेळेच्या मूल्याची संस्कृती. या प्रणालीने प्रशासनातील मानवी संवेदनांना नवी उंची दिली आहे. जेव्हा एखाद्या वृद्धाला पेन्शन वेळेत मिळते, तेव्हा ती फक्त फाईल पूर्ण झाल्याची नोंद नसते, तर त्याच्या चेहऱ्यावर उमटलेले समाधान प्रशासनाच्या मानवतेचं प्रतीक असतं.


ई-ऑफिस प्रणालीचा प्रवास म्हणजे कागदांच्या ढिगाऱ्यांमधून डिजिटल प्रकाशाकडे नेणारी वाट. तो प्रवास फक्त तांत्रिक बदलांचा नाही, तर लोकशाहीला नवा श्वास देणारा आहे. नंदुरबारचा अनुभव सांगतो की तंत्रज्ञान हे कुणाची मक्तेदारी नाही; ते डोंगर, पाडे आणि शेतीमध्येही तितक्याच ताकदीने रुजू शकतं.

आज ''फाईल हरवली'' हे वाक्य इतिहास आहे, आणि ''फाईल एका क्लिकवर'' ही वास्तवाची नवी ओळख. कदाचित काही वर्षांनी आपण मागे वळून पाहू तेव्हा लक्षात येईल की, ई-ऑफिस ही केवळ संगणक प्रणाली नव्हती तर ती भारताच्या लोकशाहीच्या नव्या अध्यायाचं पहिलं पान होती.

**रणजितसिंह राजपूत,**
**जिल्हा माहिती अधिकारी, नंदुरबार**

# गडचिरोली नद्यांचा जिल्हा, समृद्धीचा कणा





गडचिरोली, घनदाट जंगलं आणि नैसर्गिक साधनसंपत्तीसाठी ओळखला जाणारा जिल्हा, 'नद्यांचा प्रदेश' म्हणूनही ओळखला जातो. या जिल्ह्याच्या भौगोलिक आणि सांस्कृतिक जीवनात नद्यांना विशेष महत्त्व आहे. नद्यांनी गडचिरोलीची जमीन सुपीक केली आहे, जैवविविधता जपली आहे, आणि इथल्या जनजीवनाला एक वेगळी ओळख दिली आहे.

**गडचिरोलीतील नद्यांचे जाळे**

गडचिरोली जिल्ह्यात अनेक लहान-मोठ्या नद्या आहेत. काही नद्यांचा उगम इथेच होतो, तर काही शेजारच्या राज्यांतून जिल्ह्यात येतात.

जिल्ह्यात उगम पावणाऱ्या नद्या: सती नदी (७१ किमी), खोब्रागडी नदी (८१ किमी), कठाणी नदी (५८ किमी), पोहार नदी (४९ किमी), दिना नदी (४५ किमी), आणि सर्वात मोठी प्राणहिता नदी (११५ किमी) या नद्या गडचिरोलीतच उगम पावतात.

बाहेरून येणाऱ्या नद्या: वैनगंगा (जिल्ह्यात १६९ किमी), गाढवी (४५ किमी), पर्लकोटा (४३ किमी), पामुलगौतम (४० किमी), इंद्रावती (१३१ किमी), आणि गोदावरी (४६ किमी) या नद्या इतर जिल्ह्यांतून आणि राज्यांतून गडचिरोलीत प्रवेश करतात.

गडचिरोली जिल्ह्याच्या उत्तर-पश्चिम आणि दक्षिण-पूर्व सीमेवरून वैनगंगा, वर्धा, प्राणहिता, गोदावरी आणि इंद्रावती या पाच प्रमुख नद्या वाहतात. वैनगंगा नदी जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरून वाहत जाते आणि चामोर्शी तालुक्यातील चपराळा येथे वर्धा नदीला मिळते. या दोन्ही नद्यांच्या संयुक्त प्रवाहाला 'प्राणहिता' असे म्हणतात. पुढे, ही नदी जिल्ह्याच्या पश्चिम सीमेवरून वाहत जाऊन सिरोंचा येथे गोदावरीला मिळते. इंद्रावती नदी जिल्ह्याच्या दक्षिण-पूर्व सीमेवरून वाहते आणि सिरोंचा तालुक्यातील सोमनूरजवळ गोदावरीला मिळते. बांडिया, पर्लकोटा आणि पामलगौतम या नद्या इंद्रावतीला मिळतात. तर, गाढवी, खोब्रागडी, कठाणी, वैलोचना आणि दिना या नद्या जिल्ह्याच्या उत्तर भागात वाहतात. यापैकी पहिल्या चार नद्या वैनगंगेला, तर दिना नदी प्राणहिता नदीला मिळते. चामोर्शी तालुक्यातील प्रसिद्ध व प्राचीन मार्कंडादेव येथे वैनगंगा नदी उत्तरवाहिनी झाल्यामुळे या मंदिराला विशेष महत्व आहे. त्यामुळे अनेक भाविक पूर्वजांच्या नावे वैनगंगा नदीमध्ये पवित्र स्नान करून मंदिरात दर्शनासाठी जातात.

**गडचिरोलीतील महत्त्वाचे नदी संगम**

नद्यांच्या संगमामुळे गडचिरोलीत काही विशेष स्थळे तयार झाली आहेत, ज्यांना धार्मिक आणि पर्यटन दृष्ट्या महत्त्व आहे.

त्रिवेणी संगम (भामरागड): भामरागडमध्ये पर्लकोटा, पामुलगौतम आणि इंद्रावती या नद्या एकत्र येतात. पावसाळ्यात येथील दृश्य खूप आकर्षक असते. या संगमावर नयनरम्य सूर्योदय व सूर्यास्त पाहता येतो.

सोमनूर त्रिवेणी संगम (सिरोंचा): सिरोंचा तालुक्यातील सोमनूर येथे इंद्रावती, गोदावरी आणि अदृश्य असलेली अंतरवाहिनी या नद्यांचा संगम होतो. हे स्थळ धार्मिक आणि नैसर्गिक सौंदर्यासाठी प्रसिद्ध आहे. या ठिकाणी नदीचे पात्र मोठे असून, वाळू व खडकांवरून वाहणाऱ्या प्रवाहाचा नादमधुर आवाज पर्यटकांना आकर्षित करतो.

वैनगंगा-वर्धा संगम (चपराळा): गडचिरोलीच्या चपराळा येथे वैनगंगा आणि वर्धा या दोन मोठ्या नद्या एकत्र येतात आणि त्यांना 'प्राणहिता' असे नाव मिळते. ही नदी पुढे तेलंगणात गोदावरीला मिळते.

**नद्या आणि स्थानिक जीवन**

गडचिरोलीतील नद्या केवळ पाण्याचे स्रोत नाहीत, तर त्या इथल्या लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. नद्यांच्या काठावर शेतकरी भात आणि भाजीपाला पिकवतात. 'मरियाण' शेती पद्धतीमुळे स्थानिक समाजाला मोठा आधार मिळाला आहे. ढिमर समाजासाठी नद्या मासेमारीचे प्रमुख साधन आहेत. नद्यांच्या काठावर अनेक प्राचीन मंदिरे आणि धार्मिक स्थळे आहेत. तसेच, नद्यांचे संगम पर्यटन वाढवण्यातही मदत करतात.

गडचिरोली जिल्ह्यातील नद्या या फक्त जलस्रोत नाहीत तर त्या जिल्ह्याच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक जीवनाचा कणा आहेत. या नद्यांनी गडचिरोलीला एक अनोखी ओळख दिली आहे. औद्योगिकीकरणाच्या दिशेने वाटचाल करणाऱ्या गडचिरोली जिल्ह्यासाठी, येथील नद्यांचे विस्तीर्ण जाळे भविष्यात मालवाहतुकीसाठी उपयुक्त ठरू शकते. शेतीला पोषण, मासेमारीला आधार, जैवविविधतेला आश्रय आणि संस्कृतीला आधार देणाऱ्या या नद्यांचे जतन करणे ही काळाची गरज आहे.

**गजानन जाधव,**
प्र.जिल्हा माहिती अधिकारी,
गडचिरोली.



# नोबेल समितीचं अभिनंदन!

उथळ माणसाची आयुष्याची समज मपी हळद अन् हो गोरीफअशीच असते. कुठल्याही गोष्टीचं फळ त्यांना झटपट हवं असतं. आपण जे अपेक्षितो आहोत, त्यासाठी अनेकांनी आ-पली आयुष्यं वाहिली आहेत, आयुष्यभराची साधना करूनही त्यांना पाहिजे तशी मान्यता मिळालेली नाही; तर आपण कोण? आपलं योगदान किती काळाचं, किती प्रभावी आणि किती चिरदायी? असे प्रश्न त्यांना पडत नाहीत. मचकाकतं ते सगळं सोनंच असतंफअसं मानून सगळं जग सदा सर्वकाळ फसतंच असतं, यावर त्यांचा ठाम विश्वास असतो. स्वतःच्या महत्त्वाकांक्षांपलीकडे त्यांना काही दिसत नसतं. राक्षसी महत्त्वाकांक्षांनी आंधळ्या झालेल्या अशा कोण्या व्यक्तीचं उदाहरण द्यायचं असेल, तर आजघडीला अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांच्याइतकं या प्रतिचं दुसरं उत्तम उदाहरण नाही! शांततेच्या प्रयत्नांसाठीचं नोबेल पारितोषिक आपल्याला जाहीर झालं नाही, हे कळल्यानंतर त्यांनी काल जी आगपाखड केली, ती अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाला शोभणारी तर नाहीच, पण व्यक्ती म्हणूनही अत्यंत असभ्यपणाची आहे.ट्रम्प यांचं एकूणच वागणं, त्यांच्या बदलत्या भूमिका, अस्थानी बोलणं, अविचारी प्रतिक्रिया देणं, असंबंध मतप्रदर्शन करणं – हे सगळंच अस्थिर किंवा कमकुवत मानसिक स्थितीच्या लक्षणांत मोडतं, असं मानसशास्त्रज्ञांचं म्हणणं आहे.

मनोविकार तज्ज्ञांमध्येही यावर जाहीर चर्चा झाल्या आहेत. खुद्द अमेरिकेतल्या वृत्तपत्रांनी त्यावर लेख प्रसिद्ध केले आहेत. 'मानवी वर्तनात संशयास्पद; पण व्यावसायिक निर्णय आणि नफा कमवण्यात मात्र तरबेज' असं त्यांचं वर्णन केलं जातं आहे. कशाचाही धरबंद नसलेला, सभ्यतेचे सारे संकेत ज्याने गुंडाळून ठेवले आहेत, असा राष्ट्राध्यक्ष निवडल्याने अमेरिकेतील जनताही पस्तावते आहे. आपली नापसंती दर्शवण्यासाठी तिथल्या जनतेने रस्त्यावर उतरून तीव्र निदर्शनंही केली आहेत. पण, तरीही ना ट्रम्प यांच्यावर त्याचा काही परिणाम होत, ना त्यांनी निवडलेलं प्रशासन त्यातून काही धडा घेत. वयाच्या ७९ व्या वर्षी जेव्हा एखादी व्यक्ती अशी वागते, तेव्हा त्याचं विश्लेषण तरी कसं करणार? 'म्हातारपण हे पुन्हा आलेलं बालपणच असतं' असं जे गमतीने म्हटलं जातं, ते ट्रम्प यांच्याबाबतीत तंतोतंत खरं आहे, असं म्हणावं का? नोबेल न मिळाल्याने काल त्यांनी जी आदळआपट केली, ती लहान मुलाचा हट्ट पूर्ण न झाल्यानंतर मूल जसं आदळआपट करतं त्याच प्रकारची होती!

आपल्या यावेळच्या नऊ महिन्यांच्या कारकीर्दीत आतापावेतो आठ युद्ध रोखल्याचा ट्रम्प यांचा दावा आहे. त्यात अर्थातच भारत-पाकिस्तान युद्धाचाही समावेश असून त्याला भारताने आतापर्यंत पुसटसाही दुजोरा दिलेला नाही, हे महत्त्वाचं आहे. रशिया – युक्रेनमधील संघर्षात ट्रम्प यांची भूमिका सुरुवातीला रशियाच्या बाजूची होती. युक्रेनचे राष्ट्राध्यक्ष झेलेन्स्की यांची समोरासमोर खिल्ली उडवण्यापर्यंत त्यांची मजल गेली होती. रशिया आपल्या बाजूने उभी राहील, तर जग जिंकलं. मग आणखी कोणाच्या दाढीला हात लावण्याची गरजच नाही, असा त्यांचा (गैर) समज होता. त्यासाठी त्यांनी भारताला रशियाकडून कच्चं तेल खरेदी करण्याची, ते शुद्ध करून पुन्हा युरोपलाच विकण्याची गळही घातली होती. पण, दरम्यानच्या काळात रशियाचे राष्ट्राध्यक्ष व्लादीमिर पुतीन हे आपल्या हाती लागत नाहीत, हे लक्षात आल्यानंतर त्यांचा सहानुभूतीचा काटा अचानक युक्रेनकडे वळला. भारत- पाकिस्तान संघर्षावेळी त्यांनी आधी पाकिस्तानला खिशात टाकलं आणि नंतर त्याचा भारतावर दबाव टाकायला सुरुवात केली. ट्रम्प यांची व्यक्तिगत महत्त्वाकांक्षेपोटी चाललेली ही बालीश धडपड पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ओळखली आणि ट्रम्प यांच्या या प्रयत्नांना शून्य प्रतिसाद दिला.

परिणामी, त्यांनी भारतावर एकापेक्षा एक अतिरिक्त कर लादून भारताला जेरीस आणण्याचा प्रयत्न केला. जे भारताबाबत; तेच त्यांनी जगातील अन्यही अनेक देशांबरोबर केलं. पण, त्यातल्या कोणीही ट्रम्प यांना 'नोबेल'साठी समर्थनाची भीक घातली नाही. नोबेल पारितोषिक निवड समिती जिथून पारितोषिकाचा निर्णय घेते, त्या नॉर्वेवरही त्यांनी असाच दबाव टाकला. नॉर्वेचे अर्थमंत्री जेम्स स्टोनबर्ग यांना त्यांनी थेट फोन केला आणि 'नोबेल'ची सांगड नॉर्वे वरील अतिरिक्त करांशी असल्याची थेट धमकी दिली! आपल्या बक्षिसासाठी नॉर्वेवरील करांची सौदेबाजी करण्याचा हा प्रकार सर्वाधिक अश्लाघ्य म्हणावा ला-गेल. इतिहासात त्याची कायम नोंद राहील.

ट्रम्प यांच्या या प्रयत्नांची आंतरराष्ट्रीय मुत्सद्दी आणि धोरणकर्त्यांमध्ये गेले काही महिने यथेच्छ खिल्ली उडवली जाते आहे. राष्ट्रप्रमुखांच्या आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सकाळी न्याहारीच्या टेबलावरही हाच चेष्टेचा विषय चघळला जातो आहे. पण ट्रम्प आणि त्यांच्या सहकाऱ्यांना त्याचं सोयरसुतक नाही. अमेरिकेची आपण किती अप्रतिष्ठा करतो आहोत, हे त्यांच्या गांवीही नाही.

नोबेल पारितोषिक समितीवर ट्रम्प यांच्या पारितोषिकासाठी किती दबाव असेल, याची कल्पना आपण या साऱ्या प्रकारावरून करू शकतो. पण, ती समितीही चांगलीच जांबाज निघाली. त्यांनी हे सारे दबाव उधळून लावले. 'नोबेल पारितोषिकासाठी नामांकन दाखल करण्याच्या मुदतीत ट्रम्प यांचं नामांकन आलं नाही' एवढं साधं तांत्रिक कारण सांगून त्यांनी ट्रम्प पारितोषिकाच्या स्पर्धेत नव्हते; त्यामुळे त्यांचा विचार करायचा प्रश्नच आला नाही, हे अगदी सहजपणे सांगून टाकलं! 'इच्छा असेल, तर पुढील वर्षी वेळेत नामांकन दाखल करायला हरकत नाही.

तेव्हा त्यांचा विचार होऊ शकेल' हेही पुढे जोडलं आणि आपल्या बाजूने सगळ्या प्रकरणावर पडदा टाकला. यापूर्वी बराक ओबामांना ते अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष असतानाच हे पारितोषिक दिलं गेल्याने ते ट्रम्प यांना कसंही करून हवंच आहे. एवढ्या मोठ्या, सर्वोच्च पारितोषिकासाठी ते कितीही लहान व्हायला तयार आहेत! मुद्दा ट्रम्प यांनी गेल्या चार – सहा महिन्यांत काय केलं, हा नाहीच आहे. नोबेल पारितोषिक असं 'झट मंगनी पट शादी' पद्धतीने दिलंच जात नाही. तुमची विचारसरणी, त्या विचारसरणीशी एकनिष्ठ राहून तुम्ही केलेला संघर्ष, जागतिक शांततेसाठी तुमचं योगदान – हे सारं तिथे मोजलं जातं. ट्रम्प यांना याची जाण नाही, की समज नाही, माहीत नाही. आपण अमेरिकेचे अध्यक्ष आ-होत, म्हणजे जगात सर्वशक्तिमान आहोत. आपण जे म्हणू, तेच होईल हा त्यांचा गैरसमज नोबेल समितीने शांतपणे खोटा ठरवला, याबद्दल आधी नोबेल समितीचंच अभिनंदन केलं पाहिजे. मग जिला ते दिलं गेलं, त्या व्हेनेझुएलाच्या विरोधी पक्षनेत्या मारिया कोरीना मचाडो यांचं...!

# शरीरात कॅन्सर या ६ पदार्थांमुळे पसरतो, जागतिक आरोग्यचा इशारा




जागतिक आरोग्य संघटनेचा (थक्ज) असा विश्वास आहे की, दररोज खाल्लेल्या काही पदार्थांमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. जाणून घेऊया कर्करोगाचा धोका वाढवणारे पदार्थ आणि त्यामागील वैज्ञानिक कारणे.

कर्करोग हा आज जगातील सर्वात गंभीर आजारांपैकी एक बनला आहे. कर्करोगात, शरीराच्या पेशी असामान्यपणे वाढू लागतात. वैज्ञानिक संशोधनातून असे दिसून आले आहे की ८० ते ९०% कर्करोग बाह्य घटकांशी जोडलेले असतात.

सर्वात मोठे दोषी आपली जीवनशैली आणि खाण्याच्या सवयी आहेत.

काही खाण्याच्या सवयी आणि पदार्थ कर्करोगाचा धोका वाढवू शकतात. उदाहरणार्थ, प्रक्रिया केलेले मांस, तळलेले आणि जळलेले पदार्थ, जास्त साखर आणि परिष्कृत कार्बोहायड्रेट्स आणि जास्त प्रमाणात जळलेले किंवा शिजव-लेले पदार्थ खाल्ल्याने कर्करोगाचा धोका वाढतो.

जागतिक आरोग्य संघटनेचा (थक्ज) असा विश्वास आहे की दररोज खाल्लेल्या काही पदार्थांमुळे कर्करोगाचा धोका वाढू शकतो. चला कर्करोगाचा धोका वाढवणारे पदार्थ आणि त्यामागील वैज्ञानिक कारणे शोधूया.

मांसाहार पदार्थ –थक्ज (संदर्भ) नुसार, प्रक्रिया केलेले मांस हे एक प्रकारचे मांस आहे जे जास्त काळ टिकण्यासाठी विविध घटकांसह मिसळले जाते. यामध्ये हॉट डॉग, सलामी, सॉसेज आणि बीफ जर्की सारखे मांस समाविष्ट आहे. संशोधनात असे आढळून आले आहे की या पद्धती वापरून मांस जतन करताना कार्सिनोजेन्स तयार होतात. म्हणूनच प्रक्रिया केलेले मांस जास्त प्रमाणात सेवन केल्याने कोलन कर्करोग, पोटाचा कर्करोग आणि स्तनाचा कर्करोग होण्याचा धोका वाढतो.

तेलकट पदार्थ –बटाट्यांसारखे पिष्टमय पदार्थ खूप जास्त तापमानात तळले जातात तेव्हा ते ॲक्रिलामाइड नावाचे हानिकारक रसायन तयार करतात. या पदार्थात डीएनए खराब करण्याची आणि पेशी नष्ट करण्याची क्षमता असते. फ्रेंच फ्राईज आणि बटाट्याच्या चिप्स सारख्या स्नॅक्समध्ये विशेषतः भरपूर प्रमाणात हे पदार्थ असतात. संशोधनानुसार, जास्त तळलेले पदार्थ केवळ कर्करोगाचा धोका वाढवत नाहीत तर लठ्ठपणा आणि मधुमेहासारख्या आजारांना देखील कारणीभूत ठरतात. हे दोन्ही रोग शरीरात जळजळ आणि ऑक्सिडेटिव्ह ताण वाढवून कर्करोगाचा धोका वाढवतात.

अधिक शिजवलेले पदार्थ –जेव्हा मांस किंवा पिष्टमय पदार्थ खूप जास्त तापमानात शिजवले जातात, जसे की बार्बेक्यू, ग्रिलिंग किंवा उच्च-तापमान पॅन-फ्रायिंग, हानिकारक कार्सिनोजेन्स (एचसीए आणि पीएएच) तयार होतात. ही रसायने पेशींच्या डीएनएला नुकसान करतात आणि हळूहळू कर्करोगाचा धोका वाढवू शकतात. बटाट्यांसारखे पदार्थ देखील जास्त शिजवलेले किंवा जाळले असता ॲक्रिलामाइड तयार करू शकतात. सुरक्षित राहण्यासाठी, उच्च-तापमानात तळण्याऐवजी कमी-तापमानात स्वयंपाक, वाफवणे, मंद स्वयंपाक किंवा प्रेशर कुकिंग वापरणे चांगले. दुग्धजन्य पदार्थ –दूध, दही आणि चीज सारखे दुग्धजन्य पदार्थ नेहमीच आरोग्यदायी मानले जातात, परंतु काही संशोधनातून असे दिसून आले आहे की जास्त प्रमाणात सेवन केल्याने प्रोस्टेट कर्करोगाचा धोका वाढू शकतो. कारण दुग्धजन्य पदार्थ शरीरात खत्रक्क-१ (इंसुलिनसारखे वाढ घटक) पातळी वाढवतात. हे घटक प्रोस्टेट कर्करोगाच्या पेशींची संख्या वाढविण्यास आणि त्यांच्या वाढीस गती देण्यास मदत करू शकते. जरी या विषयावर सर्व संशोधन सुसंगत नसले तरी, मर्यादित प्रमाणात दुग्धजन्य पदार्थांचे सेवन करणे हा एक सुरक्षित पर्याय असू शकतो यावर तज्ज्ञ सहमत आहेत.

## सखी : मासिक पाळी

## डॉक्टर टीप्स



खरंतर ही अत्यंत सकारात्मक बाब आहे, असे मला वाटते. सध्या अनेक सामाजिक संस्थांनी मासिक पाळीविषयी जनजागृती करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे मासिक पाळीविषयीचे समाजातील गैरसमज दूर होत आहेत.

**–नितेश गावकर, कल्याण**

मासिक पाळी हा महिलांच्या आयुष्यातील नैसर्गिक भाग आहे. मासिक पाळी हे निसर्गाने महिलांना दिलेले एक वरदान आहे. इंटरनेटमुळे मासिक पाळीविषयीची माहिती सध्याच्या काळात सहज उपलब्ध आहे. त्याचबरोबर जाहिराती आणि चित्रपटामुळे मासिक पाळीविषयीची जनजागृती होत आहे. त्यामुळे समाजात मासिक पाळीविषयीच्या विचारांमध्ये बदल होताना दिसून येत आहेत. केवळ इतकेच पुरेसे नसून पालकांनीही घरातील लहान मुलींसोबत याविषयी अधिक संवाद साधणे गरजेचे आहे.

## विनोद




**गुरूजी : सांग असत्यवादी मोठा की सत्यवादी?**
**शिष्य : असत्यवादी.**
**गुरूजी : काहीतरी भलतंच कसं काय?**
**शिष्य : सत्यवादी चार अक्षरी शब्द आहे. असत्यवादी एका अक्षराने मोठा आहे.**

## संदेश

Doctor: aapke pati ko zyaada rest ki zaroorat hai. yeh sleeping tablets leejiye.
Wife: unko yeh kab dena hai doctor?
Doctor: yeh unke liye nahi, aapke liye hai

## सुविचार


**माझे ते खरे म्हणण्यापेक्षा खरे ते माझे म्हणा.**
**– अज्ञात**



**संस्कृत सुभाषित**
**अतिक्रान्तं हि यत्कार्यं पश्चाचिंतयते नर:**
**तच्चास्य न भवेत्कार्यं चिंतया च विनश्यति**
**(कर्णपर्व, अध्याय ३१, ोक २९ महाभारत)**

**अर्थ :** घटना घडून गेल्यानंतर मागाहून जो चिंता करीत बसतो, त्याचे कार्य तर होत नाहीच, पण चिंतेने नाश मात्र होतो.

# मनोरंजक महाशब्दकोडे



## आडवे शब्द

१. '---- मोरया, मंगलमूर्ती श्री गणराया' (लता मंगेशकर)
१०. मासा पकडण्याचे साधन
११. किंमत
१२. अभिनव
१४. एक रंगीत कंदमूळ
१५. दणकट, मजबूत
१७. विद्युल्लता
१८. पुळका, गहिवर, मूळ अर्थ झरा
१९. पुष्पदल
२१. रसाळ
२३. नवरा, पती
२५. सीतेच्या जुळ्या मुलातील एक
२६. काव, तांबडी माती
२८. सारखा
३१. एक छोटे चर्मवाद्य
३३. रणक्षेत्र
३६. अंत:करण
३८. पुष्कळ
४०. चित्रपटाचे संवाद
४१. पाठविलेला
४२. कलावंत
४५. शरीर
४६. आरोप
४७. निष्ठूर, दया नसलेला
४९. सबब
५०. पू.विनोबाजींनी लिहिलेले गीतेचे मराठी अनुवादित ोक
५२. सावली, प्रतिबिंब
५३. तात्पर्य
५६. एक श्वासरोग
५७. अजगर
५८. तंतोतंत जुळणारे
६०. आपला-परका अशी भावना
६३. दृष्टी, दृष्ट
६५. अति उंचीची दोन झाडे
६७. अटीची भाषा
६९. मुस्लिम प्रार्थना पद्धत
७१. पत्र
७३. लोकर, लव (इंग्रजी)
७४. शिजविलेले तांदूळ
७५. नूतन
७७. मस्ती, जोम
७८. घरोघरी पूर्वी मातीच्या असायच्या
८०. अर्धी ओंजळ
८२. सुका, वाळलेला
८४. न घडवलेले, न रूळलेले
८५. कहाणीतील गाव
८६. गुरांचे खाद्य

## उभे शब्द

१. ऐटदार चालीची स्त्री
२. पोलिस
३. गर्भाचे पोषण करणारी
४. तारण
५. मीठ
६. विधानसभेचा सदस्य
७. नमनीय
८. खूप लांब (अंतरावर)
९. जनतेचा कल आणि कौल
१३. खस
१५. फुलाची प्रथमावस्था
१६. कोवळ्या दुधाचा पदार्थ
१८. पार्वतीला शंकराने दिलेले नाव
२०. उन्हाचे तुकडे
२२. लाकडी जिना
२४. कोळिष्टक
२७. आईची वहीनी
२९. झकास
३०. अनुमती
३२. सडेतोड बोलणारा
३४. सुसर
३५. मुक्या प्राण्यांवरील प्रेम
३७. नकला करणारा
३८. रामबंधु
३९. मज्जाव, बंदी
४०. पाडाव, ऱ्हास
४३. कपडालत्ता
४४. हे दिवस ऋण काढून साजरे करू नयेत
४६. जननी, जन्म देणारी
४७. कीव, करुणा
४८. अत्यंत खालच्या दर्जाचा
५१. दिनांक
५३. वस्तू, माल
५४. अील, बीभत्य- ---- विचकट
५५. धन्यवादाचा शब्द
५७. नाविक दल
५९. वेल
६०. आमचा (बंगाली)
६१. चित्रपट
६२. मायभूमी, जमीन
६४. लोक, प्रजा
६६. छोटा डफ
६८. रविवासर
७०. जगन्माता
७२. पवित्र, शुद्ध
७६. तोटी
७८. उजेडासाठी पेटवलेली गवत इ.ची जुडी
७९. स्तुती करणारा
८१. लहान
८३. कावळा


## आडवे उत्तर

१.गजानना श्री गणराया आधी वंदू तुज १०.गळ ११.दर १२.नवा १४.गाजर १५.कणखर १७.दामिनी १८.उमाळा १९.पाकळी २१.रसदार २३.यजमान २५.लव २६.काव २८.सम ३१.डफ ३३.समरभूमी ३६.मन ३८.भरमसाट ४०.पटकथा ४१.रवाना ४२.कलाकार ४५.तन ४६.आळ ४७.दयाहीन ४९.कारण ५०.गीताई ५२.पडछाया ५३.सार ५६.दमा ५७.आर ५८.चपखल ६०.आपपरभाव ६३.नजर ६५.ताडमाड ६७.जरतर ६९.नमाज ७१.टपाल ७३.फर ७४.भात ७५.नवीन ७७.रग ७८.चुली ८०.पसा ८२.वाळका ८४.अनघड ८५.आटपाटनगर ८६.कडबा

## उभे उत्तर

१.गजगामिनी २.नगरपाल ३.नाळ ४.गहाण ५.रामरस ६.आमदार ७.वंदनीय ८.दूर ९.जनमानस १३.वाळा १५.कळी १६.खरवस १८.उमा २०.कवडसा २२.दादर २४.जळमट २७.मामी २९.मस्त ३०.पवानगी ३२.फटकळ ३४.मगर ३५.भूतदया ३७.नकलाकार ३८.भरत ३९.मना ४०.पतन ४३.कापडचोपड ४४.सणवार ४६.आई ४७.दया ४८.हीन ५१.तारीख ५३.सामान सामान ५४.अचकट ५५.आभार ५७.आरमार ५९.लता ६०.आमार ६१.रजतपट ६२.वतन ६४.जन ६६.डफली ६८.रविवार ७०.जगदंबा ७२.पावन ७६.नळ

# चंदेरी दुनिया



## आमंत्रण नसतानाही बिग बींच्या बर्थडेला ती आली अन् बाथरूममध्ये लपली!

मुंबई: बॉलिवूडचे महानायक अमिताभ बच्चन आज त्यांचा ८३ वा वाढदिवस साजरा करत आहेत. त्यांच्या व्यावसायिक आणि खासगी आयुष्यातील अनेक किस्से आजही चर्चेत असतात. विशेषत: त्यांचे आणि अभिनेत्री रेखा यांचे नाते अनेक वर्षांपासून गूढतेचा विषय राहिले आहे.



अमिताभ बच्चन यांच्या वाढदिवसानिमित्त आज त्यांच्या आयुष्यातील एका अविस्मरणीय घटनेची चर्चा होत आहे.

निमंत्रण नसताना पार्टीत एन्ट्री

वर्ष २००२. ११ ऑक्टोबर रोजी अमिताभ बच्चन यांच्या ६० व्या वाढदिवसाची मोठी पार्टी मुंबईतील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित करण्यात आली होती. या पार्टीत कुटुंबासह अनेक मित्र-मंडळी उपस्थित होते. मात्र, आश्चर्याची गोष्ट म्हणजे या सोहळ्याला रेखा यांना आमंत्रण नव्हते.

तरीही रेखा पार्टीत दाखल झाल्या. रेखा यांना पाहताच उपस्थित असलेल्या बच्चन कुटुंबासह सर्वांचे चेहरे आश्चर्यचकित झाले. एक मोठी अभिनेत्री बिना आमंत्रण पार्टीत कशी आली, याचेच सर्वांना आश्चर्य वाटले.

अनपेक्षित घटना आणि बाथरूमचा आश्रय


अमिताभ आणि रेखा यांच्या भेटीची ही बातमी मीडियापर्यंत पोहोचण्यास फारसा वेळ लागला नाही. काही क्षणातच फोटोग्राफर्सचा ताफा हॉटेलमध्ये दाखल झाला. कॅमेऱ्यांचा फ्लॅश आणि मीडियाची गर्दी पाहून रेखा इतक्या घाबरल्या की त्यांनी हॉटेलच्या बाथरूमकडे धाव घेतली आणि स्वतः ला आतून बंद करून घेतले!

भीती होती 'त्या' फोटोंची

मिळालेल्या माहितीनुसार, रेखा बराच वेळ बाथरूममध्ये बंद होत्या. मीडियाचे प्रतिनिधी पार्टीतून निघून गेल्याची खात्री झाल्यावरच त्या बाहेर आल्या. त्यांना अमिताभ बच्चन यांच्यासोबतचे त्यांचे फोटो सार्वजनिक होऊ नयेत याची भीती वाटत होती. कारण या फोटोंमुळे पुन्हा एकदा खळबळ माजेल अशी त्यांना अजिबात इच्छा नव्हती.

अनेक चित्रपटांत दोघांनी एकत्र काम केलेले हे दोन दिग्गज कलाकार. अमिताभ बच्चन आता कुटुंबासोबत आहेत, तर रेखा आजही सिंगल राहून त्यांचे आयुष्य जगत आहेत.

## अभिनेते अजय पूरकर साकारणार खलनायक



नायकाप्रमाणे क्रूर खलनायकही चित्रपटांत गाजलेत! याआधी सकारात्मक भूमिकेत दिसलेले कलाकार आता नकारात्मक पात्र साकारताना दिसत आहेत. या यादीत आता अभिनेते अजय पूरकर यांचा समावेश झाला आहे. आगामी 'अभंग तुकाराम' या चित्रपटात 'मंबाजी' या नकारात्मक रूपात आपल्याला ते दिसणार आहेत. दिग्पाल लांजेकर दिग्दर्शित 'अभंग तुकाराम' चित्रपट ७ नोव्हेंबरला आपल्या भेटीला येणार आहे. पॅनोरमा स्टुडिओज ही नामांकित निर्मिती संस्था या चित्रपटाचे प्रस्तुतकर्ते आहेत. चित्रपटाचे निर्माते कुमार मंगत पाठक, अभिषेक पाठक असून सहनिर्माते मुरलीधर छतवानी, रवींद्र औटी आहेत.

संत तुकोबांचे वाढते प्रस्थ पाहून ज्यांच्या ज्यांच्या पोटात दुखत होते त्यात मंबाजी हे आघाडीवर होते. काही ना काहीतरी कुरापत काढायची आणि संत तुकोबांना छळायचे हे त्यांचे नित्याचेच काम होते. 'मंबाजी' यांचा नीचपणा एवढा होता की तुकोबांना गुरुस्थानी मानणाऱ्या बहिणाबाई यांनी त्याचे वर्णन विंचवाची नांगी । तैसा दुर्जन सर्वांगी असे केलेले आहे.

'मंबाजी' या आपल्या खलनायकी भूमिकेबद्दल बोलताना अजय पूरकर सांगतात, 'या आधीच्या माझ्या बऱ्याच भूमिका सकारात्मक प्रवृत्तीच्या होत्या. आजवरच्या माझ्या प्रत्येक भूमिकेला प्रेक्षकांचं भरभरून प्रेम मिळालं आणि आता नाण्याच्या दुसऱ्या बाजूला येऊन एक वेगळा प्रयत्न या चित्रपटातून मी केला आहे. ही व्यक्तिरेखा कमाल ताकदीची आहे. कलाकार म्हणून स्वीकारलेली ही व्यक्तिरेखा मला खूप महत्त्वाची वाटते.

कलाकार म्हणून माझ्या प्रत्येक भूमिकेमध्ये मी वेगळेपण कसं आणू शकतो हे महत्त्वाचं आहे.'अभंग तुकाराम' चित्रपटातील या भूमिकेच्या निमित्ताने मला ही संधी मिळाली. 'अभंग तुकाराम' चित्रपटाची कथा आणि संवाद प्रसिद्ध लेखक योगेश सोमण यांचे आहे. दिग्पाल लांजेकर

## भारतीय राष्ट्रपती बघणार कांतारा चॅप्टर १ चित्रपट

नवी दिल्ली : बॉलीवूड सोबतच आता दाक्षिणात्य चित्रपटसृष्टीचीही लोकप्रियता वाढत आहे. जगभर दाक्षिणात्य चित्रपट बघणाऱ्यांची संख्या झपाट्याने वाढत आहे.

कांतारा या चित्रपटाने जवळपास ४०० कोटींचा गल्ला जमवला. देशात विदेशात सगळीकडेच त्याला लोकांची पसंती मिळाली . त्यातच आता कांतारा चॅप्टर १ हा चित्रपट लोकांच्या भेटीला आला आहे. हा चित्रपट पुराणकथा या विषयाला धरुन असल्याने श्रद्धेचा आणि भावनेचा प्रश्न जपणे आवश्यक होते. या सर्व भावनांचा आदर करत चित्रपटाचा विशेष खेळ राष्ट्रपती भवन येथे होणार आहे.





षभ शेट्टी कांतारा या चित्रपटामुळे घराघरात पोहचला त्याची चित्रपटातील प्रचंड मेहनत दिसून आली आणि प्रेक्षकांना ती भावली. त्याच्या या उत्कृष्ट कामामुळे मागच्या वर्षीचा उत्कृष्ठ अभिनेता हा राष्ट्रीय पुरस्कार त्याला मिळाला. हा चित्रपट राष्ट्रपती भवनात प्रदर्शित होत असल्याने भारतीयांचा चित्रपटसृष्टीविषयीचा आदर वाढला आहे.


कांतारा चॅप्टर १ चित्रपटाविषयी बोलताना अभिनेता ऋषभ शेट्टी याने आपल्या इन्स्टाग्राम अकाउंटवर प्रेक्षकांचे आभार मानले आहेत. या सोबत त्याने त्याच्या काही आठवणीही शेअर केल्या आहेत. तो म्हणतो २०१६ सारखी एक वेळ होती जेव्हा एक शो साठी वाट बघावी लागत होती. पण आता ५००० पेक्षा जास्त सिनेमागृहात शो हाऊसफुल जात आहेत. आणि हा प्रवास प्रेक्षकांकडून मिळणाऱ्या प्रेम, पाठिंबा, विश्वास आणि देवावरील श्रद्धा याशिवाय अपूर्ण आहे. मी त्या सगळ्यांचे आभार मानतो ज्यामुळे हे सर्व शक्य झाले; असे ऋषभ शेट्टी म्हणाले.

कांतारा चॅप्टर १ ची कमाई

कांतारा चॅप्टर १ चे दिग्दर्शन आणि लेखन स्वतः ऋषभ शेट्टी याने केले आहे. चित्रपटात रुक्मिणी वसंत,गुलशन देवैया,जयराम यांनी काम केले आहे. जगभरातून २५० कोटींची कमाई करणाऱ्या या चित्रपटाने अवघ्या चार दिवसात हे पैसे कमावले आहेत. आता वीकेंडला हा चित्रपट ५०० कोटींचा टप्पा ओलांडेल असे मत व्यक्त होत आहे.

## रिया चक्रवर्तीला दिलासा

### मुंबई उच्च न्यायालयाने पासपोर्ट परत करण्याचे दिले आदेश!





मुंबई : मुंबई उच्च न्यायालयाने मंगळवारी नार्कोटिक्स कंट्रोल ब्युरो (छउइ) ला अभिनेत्री रिया चक्रवर्तीचा पासपोर्ट परत करण्याचे आदेश दिलेआहे. हा पासपोर्ट २०२० मध्ये अभिनेता सुशांत सिंग राजपूतच्या मृत्यूशी संबंधित अंमली पदार्थ प्रकरणात जप्त करण्यात आला होता. या प्रकारणांनंतर तब्बल ५ वर्षांनी रियाला तिचा पासपोर्ट परत मिळणार आहे.

न्यायमूर्ती नीला गोखले यांच्या नेतृत्वाखालील खंडपीठाने रियाच्या हेतूंवर शंका घेण्याचे काहीही कारण नसल्याचे नमूद करत, तिला पासपोर्ट परत मिळावा असा निर्णय दिला. मात्र, न्यायालयाने काही अटींसह पासपोर्ट परत देण्याचे आदेश दिले आहेत.कोणत्या अटी घालण्यात आल्या?

प्रत्येक सुनावणीला रियाने हजर राहणे बंधनकारक आहे, विशेष सूट मिळाली तरच अनुपस्थित राहता येईल.

विदेश प्रवासाच्या आधी किमान चार दिवस आधी तिने प्रवासाचा तपशील (फ्लाइट आणि हॉटेल्सची माहिती) सरकारी वकिलांना कळवणे आवश्यक आहे.तिने मोबाईल क्रमांक तपास संस्थांना द्यावा, मोबाईल सतत सुरू ठेवावा, आणि परदेशातून परतल्यानंतर तात्काळ माहिती द्यावी.

रिया चक्रवर्तीची भावना: धीर हा माझा पासपोर्ट होता.न्यायालयाच्या निर्णयानंतर, रियाने इन्स्टाग्रामवर स्वतःचा पासपोर्ट हातात धरलेला फोटो शेअर करत भावनिक पोस्ट लिहिली. ती म्हणाली गेल्या पाच वर्षांपासून धीर हाच माझा एकमेव पासपोर्ट होता. अनेक संघर्ष, निरंतर आशा... आज पुन्हा माझ्या हातात माझा पासपोर्ट आहे. माझ्या पुढच्या मी प्रवासासाठी सज्ज आहे! सत्यमेव जयते.या पोस्टवर करिश्मा तन्ना, फातिमा सना शेख आणि विक्रांत मेस्सी यांसारख्या कलाकारांनी तिला अभिनंदन केले.

रिया चक्रवर्तीला व्यावसायिक कामांसाठी परदेशात जाण्याची गरज असून पासपोर्ट जप्त झाल्यामुळे ती संधी गमावत होती. त्यामुळे तिने नवीन अर्ज करून पासपोर्ट परत मागितला होता. तिच्या वकिलांनी न्यायालयाला सांगितले की, रियाने सर्व न्यायालयीन अटींचे पालन केले असून ती पुढेही नियम पाळेल.

जून २०२० रोजी सुशांत सिंग राजपूतच्या मृत्यूनंतर सुरू झालेल्या ड्रग्ज चौकशीत, (छउइ) ने सप्टेंबर २०२० मध्ये रियाला अटक केली होती. त्यावेळी तिचा पासपोर्ट जप्त करण्यात आला होता आणि जामीनाच्या अटींमध्ये पासपोर्ट जमा करण्याची अट होती.ह्या निर्णयामुळे रियाला पुन्हा तिच्या व्यावसायिक आयुष्याला गती मिळण्याची शक्यता आहे.

## अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकरने सांगितला तो भयानक किस्सा...



मुंबई : महाराष्ट्राची हास्यजत्रा या शोमधून घराघरात पोहचलेली सर्वांची लाडकी अभिनेत्री प्रियदर्शनी इंदलकरला आपण सर्वच ओळखतो. सोशल मीडियावर तिचे हजारो चाहते असून आपले ग्लॅमरस फोटो आपल्या चाहत्यांसोबत शेअर करत असते.

हास्यजत्रेनंतर तिने मराठी चित्रपटांमध्ये काम करायला सुरुवात केली नुकताच तिचा दशावतार हा चित्रपट प्रदर्शित झाला. ज्यात तिने वंदू ही भूमिका साकारली होती. दशावतार निमित्त दिलेल्या एका मुलाखतीत तिने आपले काही अनुभव प्रेक्षकांना सांगितले. त्यातच तिने तिच्या आयुष्यात घडलेल्या अविस्मरणीय अशा एका भयानक प्रसंगाबद्दल सांगितलं. यावेळी तिने 'जर उपचार मिळाले नसते तर मी संपले असते असंही म्हटलं.

ुण्याहून साताऱ्याकडे प्रवास करताना प्रियदर्शिनी इंदलकर आणि तिच्या आईचा भीषण अपघात झाला . वाळुंज गावाजवळ त्यांच्या गाडीने १५० किमी वेगात दुभाजकाला जोरदार धडक दिली . त्या वेळी प्रियदर्शिनी मागच्या सीटवर आडवी झोपलेली होती. धडकेच्या वेळी ती मधल्या पॅसेजमध्ये पडली आणि तिथल्या बंपमुळे तिच्या पोटाला गंभीर दुखापत झाली. या धडकेत तिची स्प्लीन तुटली आणि आतून मोठा रक्तस्राव झाला.

सुरुवातीला प्रियदर्शिनीला फक्त हात आणि खांद्यास मार लागल्याचं दिसत होतं, त्यामुळे सर्वांचं लक्ष तिच्या गंभीर अवस्थेत असलेल्या आईकडे होतं. अपघात झाला तेव्हा आईला कदाचित झोप लागली असावी.

त्यानंतर तिथल्या लोकांनी आम्हाला जवळच्या एका हॉस्पिटल यामध्ये नेलं. या अपघातानंतर तिचे वडील चेन्नईहून तातडीने आले. त्यावेळी ते ज्या विमानाने आले त्याआधीचं विमान क्रॅश झालं होतं, त्यामुळे कुटुंबावर एकाच वेळी दुहेरी धक्का बसला होता.

हॉस्पिटल मध्ये असताना सतत पोटदुखत होते म्हणून सोनोग्राफी केली. डॉक्टरांनी सांगितलं कि अवस्था नाजूक आहे. रक्तस्राव होत असल्याने ब्ल्ड फक्त ३-४ इतके राहिले होते. त्यामुळे उपचार घेण्यासाठी जरा जरी उशीर झाला असता तर मी तशीच झोपेत संपले असते.

पुढे ती म्हणते सांगलीचे डॉ. जाधव यांनी ऑप्रेशन न करण्याचा सल्ला दिला आणि नुसत्या गोळ्यांवर शरीरातला रक्तस्राव थांबवला. आणि सुदैवाने माझ्या शरीराने हि याला उत्तम साथ दिली. अपघातात डाव्या हाताला लागले होते आणि त्याची खूण अजूनही माझ्या हातावर आहे आणि ती मी तशीच ठेवली आहे. कारण ती खूण सतत मला माझ्या पुनर्जन्माची आठवण करून देते.

## लग्नाआधी ट्विंकलने अक्षयच्या ५६ मेडिकल टेस्ट का केल्या?

ट्विंकलने मेडिकल टेस्टसाठी काय तयारी केली होती? या टेस्टमुळे अक्षयला कशी प्रतिक्रिया होती?

बॉलिवूडमधील सर्वात लोकप्रिय जोडप्यांपैकी एक म्हणजे अक्षय कुमार आणि ट्विंकल खन्ना. त्यांच्या नात्यातील प्रेम, मिश्किल भांडणं आणि मस्तीदार क्षण कायमच चाहत्यांच्या चर्चेत राहतात. ट्विंकल खन्ना अनेकदा आपल्या खासगी आयुष्यातील मजेशीर आणि रोचक किस्से खुलेपणाने सांगते. तिच्या 'मिसेस फनीबोन्स' या पुस्तकाच्या प्रकाशनप्रसंगी ट्विंकलने एका थरारक आणि आश्चर्यकारक किस्स्याबद्दल खुलासा केला. तिने सांगितले की, लग्नापूर्वी तिने अक्षय कुमारच्या तब्बल ५६ मेडिकल टेस्ट केल्या होत्या. ट्विंकलने ही माहिती गोळा करण्यामागचं कारण सांगितलं की, तिला भविष्यकाळात मुलांना




कोणताही आनुवंशिक आजार होऊ नये, म्हणून ती अक्षयच्या संपूर्ण आरोग्याची खात्री घेऊ इच्छित होती.-इझ ने दिलेल्या अहवालानुसार, ट्विंकलने फक्त ५-६ नव्हे तर ५६ वेगवेगळ्या टेस्ट करून अक्षयच्या आरोग्याबाबत सखोल माहिती मिळवली. ट्विंकलने स्पष्ट केले की, तिने अक्षयच्या कुटुंबात कोणत्या प्रकारचे रोग आहेत, कोणाला कोणत्या वयात कोणती समस्या आली होती, याबाबतची माहिती गोळा केली होती. ती म्हणाली, 'मला अक्षयसोबत लग्न करायचं होतं आणि मला माहित होतं की, आम्हाला भविष्यात मुलांना जन्म द्यायचा आहे. त्यामुळे अक्षयच्या संपूर्ण नातेवाईकांची मी यादी बनवली होती.'

ट्विंकलच्या या सखोल तयारीमुळे अक्षय कुमारसारख्या फिट आणि तंदुरुस्त अभिनेत्यालाही लग्नाआधी या 'मेडिकल टेस्टच्या अग्निपरीक्षेतून' जावे लागले. तिच्या या पाऊलामुळे तिने भविष्यकाळात मुलांना आरोग्याविषयक कोणतीही समस्या येणार नाही, याची पूर्ण खात्री केली. ट्विंकलच्या या निर्णयावर चाहत्यांनीही खूपच कौतुक केले असून, तिच्या संवेदनशीलतेचा आदर व्यक्त केला आहे. या खुलाश्यानंतर चाहत्यांमध्ये ट्विंकलच्या काळजीपूर्ण आणि विवेकपूर्ण निर्णयाबाबत चर्चा रंगली आहे. अक्षय आणि ट्विंकल यांचा हा किस्सा सध्या सोशल मीडियावरही जोरदार चर्चेत आहे.

## आधी साठ कोटी जमा करा, मुंबई उच्च न्यायालयाचा आदेश

व्यावसायिक राज कुंद्रा आणि त्याची पत्नी बॉलिवूड अभिनेत्री शिल्पा शेट्टी या दोघांवर आर्थिक गैरव्यवहार केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात कायदेशीर कारवाई सुरू आहे. ही कारवाई सुरू असेपर्यंत देशाबाहेर जाण्यास राज आणि शिल्पा या दोघांना मनाई करण्यात आली आहे. पण परदेशी जाणे आवश्यक आहे असा पवित्रा घेत शिल्पाने न्यायालयाकडे परवानगी मागितली आहे. या विनंती अर्जावर सुनावणी घेतल्यावर मुंबई उच्च न्यायालयाने शिल्पाला आधी साठ कोटी रुपये न्यायालयीन कस्टडीत जमा करा, असा आदेश दिला. या आदेशाविरोधात सर्वोच्च न्यायालयात दाद मागणे अथवा पैसे न्यायालयीन कस्टडीत जमा करणे हे दोनच पर्याय राज आणि शिल्पा यांच्याकडे आहेत. पोर्नोग्राफी, आर्थिक अफरातफर अर्थात मनी लाँडरिंग असे गंभीर आरोप असल्यामुळे राज कुंद्रा आणि अभिनेत्री शिल्पा शेट्टी न्यायालयाच्या कचाट्यात





सापडले आहेत. या प्रकरणात दिलासा मिळावा यासाठी शिल्पाने उच्च न्यायालयात दाद मागितली. पण शिल्पाचा हा प्रयत्न अयशस्वी झाला आहे.मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टी या दोघांविरोधात लूकआऊट नोटीस अर्थात दिसताक्षणी अटक करण्यासाठी वॉरंट काढले आहे. यामुळे दोघेही न्यायालयीन परवानगी शिवाय परदेशी जाऊ शकत नाहीत. या पार्श्वभूमीवर एका इव्हेंटचे कारण देत शिल्पा शेट्टीने २५ ते २९ ऑक्टोबर या काळात कोलंबोला जाण्यासाठी न्यायालयाकडे परवानगी मागितली आहे. फोनवरुन आमंत्रण मिळाले आहे असे कारण देत सादर करणे अशक्य आहे, असेही शिल्पाच्यावतीने न्यायालयाला सांगण्यात आले. यानंतर मुंबई उच्च न्यायालयाने शिल्पाला आधी साठ कोटी रुपये न्यायालयीन कस्टडीत जमा करा, असा आदेश दिला.

नेमके काय आहे प्रकरण ?

राज आणि शिल्पा यांनी अपुरी माहिती देत दिशाभूल केली आणि ६० कोटींची गुंतवणूक करण्यास भाग पाडले अशी तक्रार दीपक कोठारी यांनी केली. या तक्रारीचा तपास करुन मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने राज आणि शिल्पा विरोधात कायदेशीर कारवाई सुरू केली. दोघांविरोधात लूकआऊट नोटीस काढण्यात आली. यामुळे परदेशी जाणे राज कुंद्रा आणि शिल्पा शेट्टीसाठी अशक्य झाले. या पार्श्वभूमीवर शिल्पा शेट्टीने न्यायालात दाद मागितली आहे. परदेशी जाण्यासाठी परवानगी मिळावी म्हणून शिल्पा प्रयत्न करत आहे. पण उच्च न्यायालयाने

# मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागात झालेल्या ५५ व्या डीआरयूसीसी बैठकीत प्रवासी-केंद्रित विकासावर चर्चा

**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाच्या विभागीय रेल्वे वापरकर्ते सल्लागार समितीची (डीआरयूसीसी) ५५ वी बैठक १० ऑक्टोबर २०२५ रोजी सोलापूर येथील डीआरएम कार्यालयातील संगम सभागृहात आयोजित करण्यात आली होती. या बैठकीचे अध्यक्षपद सोलापूर रेल्वे विभागाचे विभागीय रेल्वे व्यवस्थापक (डीआरएम), डॉ. सुजीत मिश्रा यांच्याकडे होते. यावेळी सोलापूर, कलबुरगि, लातूर, कुर्डुवाडी, पंढरपूर आणि जेउर येथील खासदारांचे प्रतिनिधी, विविध प्रवासी आणि व्यापारी संघटनांचे प्रतिनिधींसह डीआरयूसीसी सदस्यांचे १२ प्रतिनिधी उपस्थित होते.

भारतीय रेल्वेच्या सहभागी प्रशासन आणि सतत सेवा सुधारणेच्या वचनबद्धतेनुसार, रेल्वे प्रशासन आणि रेल्वे वापरकर्ते यांच्यात अर्थपूर्ण सल्लामसलत आणि विचारांची देवाणघेवाण करण्यासाठी ही बैठक एक महत्त्वाचे व्यासपीठ म्हणून काम करत होती. सत्रादरम्यान, डीआरएम सोलापूर यांनी समिती सदस्यांना सोलापूर विभागाने हाती घेतलेल्या असंख्य उपक्रमांची आणि प्रवासी-केंद्रित विकासाची माहिती दिली.

त्यांनी खालील विषयावर प्रकाश टाकला:

- पंढरपूर येथे आषाढी एकादशीसाठी केलेल्या यशस्वी व्यवस्था, यात्रेकरूंची सुरळीत वाहतूक आणि प्रवाशांची सोय सुनिश्रि्चत करणे.
- प्रवाशांच्या वाहतुकीतील अपेक्षित वाढ कार्यक्षमतेने हाताळण्यासाठी आगामी कार्तिकी एकादशीची तयारी जोरात सुरू आहे.
- अलिकडच्या पुरात रेल्वे सेवांचे कार्यक्षम व्यवस्थापन, सुरक्षितता सुनिश्रि्चत करणे आणि सेवांमध्ये कमीत कमी व्यत्यय आणणे.
- प्रवाशांच्या सुविधा, कार्यक्षमता आणि सुलभता वाढवणे यावर लक्ष केंद्रित करून विभागभर पायाभूत सुविधांमध्ये सुधारणा सुरू आहेत.
- सर्व प्रवाशांसाठी समावेशकता आणि प्रवास सुलभता सुनिश्रि्चत करण्यासाठी विविध स्थानकांवर दिव्यांगजन-अनुकूल सुविधा सुरू करणे.
- वाढत्या प्रवाशांच्या मागणीची पूर्तता करण्यासाठी उत्सवाच्या काळात विशेष गाड्या चालवणे.

डीआरयूसीसीच्या सदस्यांनी प्रवाशांच्या सुविधा, कार्यक्षमता आणि ग्राहकांच्या समाधानात सुधारणा करण्यासाठी सोलापूर विभागाने केलेल्या प्रयत्नांबद्दल कौतुक व्यक्त केले. प्रवाशांच्या सोयी आणि सेवेची गुणवत्ता आणखी मजबूत करण्यासाठी त्यांनी मौल्यवान सूचना आणि अभिप्राय देखील शेअर केले. विभागीय स्तरावरील सल्लागार संस्था, DRUCC, रेल्वे प्रशासन आणि रेल्वे वापरकर्त्यांमध्ये नियमित संवादासाठी एक व्यासपीठ प्रदान करते, ज्याचे प्रतिनिधित्व विविध वापरकर्ता गटांद्वारे केले जाते. वापरकर्त्यांच्यांचे प्रश्र्न आणि सूचना ऐकल्या जातात याची खात्री करण्यात, सेवा सुधारणा आणि प्रवाशांच्या समाधानासाठी सहयोगी दृष्टिकोनाला प्रोत्साहन देण्यात ही संस्था महत्त्वाची भूमिका बजावते.

अतिरिक्त विभागीय रेल्वे व्यवस्थापक श्री अंशुमाली कुमार आणि वरिष्ठ विभागीय वाणिज्य व्यवस्थापक श्री योगेश पाटील, वरिष्ठ विभागीय परिचालन व्यवस्थापक श्री ब्रजेश राय, वरिष्ठ विभागीय अभियंता (समन्वय) श्री सचिन गाणेर, वरिष्ठ विभागीय विद्युत अभियंता (सामान्य) श्री अभिषेक चौधरी, वरिष्ठ विभागीय यांत्रिक अभियंता श्री रामलाल प्यासे, सहाय्यक वाणिज्य व्यवस्थापक श्री सुदर्शन देशपांडे आणि इतरांसह वरिष्ठ अधिकारी बैठकीदरम्यान उपस्थित होते. बैठकीचा समारोप सोलापूर विभागात रेल्वे सेवा आणि प्रवासी अनुभव अधिक मजबूत करण्यासाठी वचनबद्धतेची पुष्टीने झाला.

## मैदानी स्पर्धेत कॉक्सिटचे यश



**लातूर/प्रतिनिधी** : नांदेडच्या स्वामी रामानंद तीर्थ विद्यापीठ व येथील राजर्षी शाहू महाविद्यालयाच्यावतीने घेण्यात आलेल्या मैदानी स्पर्धेत येथील कॉक्सिट महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये यश संपादन केले आहे.

महाविद्यालयाची वैष्णवी जाधव हिने भालाफेक स्पर्धेत द्वितीय क्रमांक पटकावला. विभागीय स्पर्धेसाठी तिची निवड झाली आहे. हातोडा फेक स्पर्धेत श्रावणी उडगे द्वितीय आली आहे. तिचीही विभागीय स्पर्धेसाठी निवड झाली. तिहेरी उडी स्पर्धेत ओंकार माळी या विद्यार्थ्याने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याची निवड विभागीय स्पर्धेसाठी झाली आहे. अभिषेक शिंदे या विद्यार्थ्याने शंभर मीटर धावणे स्पर्धेत तृतीय क्रमांक पटकावला आहे.

या यशाबद्दल रॉयल एज्युकेशन सोसायटीचे संस्थापक डॉ. एम. आर. पाटील, उपाध्यक्ष एल. एम. पाटील, प्राचार्य डॉ. व्ही.ए. जाधव, उपप्राचार्य डॉ. एन. एस. झुल्पे, उपप्राचार्य डॉ. व्ही. व्ही. भोसले, डॉ. डी. आर. सोमवंशी, ट्रेनिंग व प्लेसमेंट प्रमुख प्रा. कैलास जाधव, क्रीडा विभाग प्रमुख प्रा. बालकिशन देवडे, प्रबंधक संतोष कांबळे, अधीक्षक प्रदीप कावळे यांनी कौतुक केले आहे.

## भाजयुमो नुतन जिल्हाध्यक्ष ऋषीकेश कराड यांच्याकडून भाजपा जिल्हाध्यक्ष बसवराज पाटील यांचे आभार



**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय जनता युवा मोर्चा जिल्हाध्यक्षपदी नियुक्ती केल्याबद्दल भाजपाचे लातूर जिल्हा ग्रामीण अध्यक्ष श्री. बसवराज पाटील मुरूमकर यांचा यथोचित सत्कार करून भाजयुमोचे नूतन जिल्हाध्यक्ष श्री. ऋषिकेश रमेशआप्पा कराड यांनी आभार व्यक्त केले आहेत.

भारतीय जनता पार्टी लातूर ग्रामीण जिल्हा कार्यकारणी जिल्हाध्यक्ष श्री. बसवराज पाटील यांनी नुकतीच जाहीर केली असून या कार्यकारणीत युवा मोर्चाच्या जिल्हाध्यक्ष पदाची जबाबदारी भारदस्त वकृत्व शैली, संघटन कौशल्य असलेले लातूर ग्रामीणचे युवा नेते ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांच्यावर देण्यात आली आहे. भाजयुमोचे नूतन जिल्हाध्यक्ष श्री. ऋषिकेशदादा रमेशआप्पा कराड यांनी गुरुवारी सकाळी भाजपाचे ग्रामीण जिल्हाध्यक्ष श्री. बसवराज पाटील यांच्या मुरूम येथील निवासस्थानी जाऊन यथोचित सत्कार केला व भारतीय जनता युवा मोर्चाची जबाबदारी दिल्याबद्दल आभार व्यक्त केले. यावेळी जिल्हाध्यक्ष श्री. बसवराज पाटील यांनी आगामी काळातील स्थानिक स्वराज्य संस्थेच्या नगरपंचायत नगरपालिका आणि जिल्हा परिषद पंचायत समिती निवडणूक अनुषंगाने चर्चा झाली आणि जिल्हाभरात युवा मोर्चाचे असलेले संघटन अधिक मजबूत करावे केंद्र आणि राज्य सरकारच्या तरुणांसाठी असलेल्या कल्याणकारी योजनां ग्रामीण भागापर्यंत पोहोचवाव्यात अशी सूचना केली तर नूतन भाजयुमोचे जिल्हाध्यक्ष श्री. ऋषिकेश कराड यांनी भारतीय जनता पार्टीच्या नेतृत्वाने माझ्यावर टाकलेला विश्वास संघटनात्मक पक्ष कार्यातून निश्चितपणे सार्थ करून दाखवीन अशी ग्वाही दिली. यावेळी भारतीय जनता पार्टीचे प्रताप पाटील, सुरज शिंदे, विजय चव्हाण, अमर चव्हाण, संजय ठाकूर, दत्ता आंबेकर, प्रशांत शिंदे, नरेश चपटे, लक्ष्मण खलंग्रे, दत्ता उगिले यांच्यासह अनेक जण होते.

## ८६ पूरग्रस्त विद्यार्थ्यांना 'स्कूल किट'चे वाटप

**धाराशिव/प्रतिनिधी** : धाराशिव पूरग्रस्त विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हास्य फुलवण्यासाठी व त्यांच्या शिक्षणाला पुनरुज्जीवित करण्यासाठी ३८६ विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांना शालेय साहित्याने युक्त 'स्कूल किट' वाटप करण्यात आले. हा स्तुत्य उपक्रम टच - टर्निंग अपॉर्च्युनिटीज फॉर अपलिफ्टमेंट अँड चाइल्ड हेल्प (मुंबई) या स्वयंसेवी संस्थेने राबविला. मुसळधार पावसामुळे परांडा तालुक्यातील देवगाव,वडनेर, वागेगव्हाण व लाहोरा या गावांमध्ये भीषण पूरस्थिती निर्माण झाली.या पुराच्या पाण्यात घरे,गुरेढोरे,शाळा तसेच विद्यार्थ्यांचे अभ्यासाचे साहित्य वाहून गेले. गावोगाव दुःखाचे सावट पसरले होते. अशा कठीण प्रसंगी जिल्हा मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष पुढे आला व त्यांनी बाधितांना मदतीचा हात दिला. याच पार्श्वभूमीवर,समाजसे वा अधीक्षक (वैद्यकीय) मनेश खंडागळे यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत,'टच - टर्निंग अपॉर्च्युनिटीज फॉर अपलिफ्टमेंट अँड चाइल्ड हेल्प' (मुंबई) या स्वयंसेवी संस्थेने एक हृदयस्पर्शी उपक्रम राबविला. या उपक्रमातंर्गत ३८६ विद्यार्थिनी-विद्यार्थ्यांना शालेय साहित्याने युक्त 'स्कूल किट' वाटप करण्यात आले.या वेळी 'टच' संस्थेचे उमाकांत पांचाळ व सहकाऱ्यांनी लाभार्थी मुलांशी थेट संवाद साधून त्यांना आत्मविश्वासाने आणि नव्या उमेदीनं शिक्षण सुरू ठेवण्याचे प्रोत्साहन दिले.हा उपक्रम कक्षाचे अध्यक्ष तथा वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरज मोटे, टच बालग्राम संस्थेचे विश्वस्त यांच्या मार्गदर्शनाखाली सहकारी तुकाराम डोलारे आणि महारुद्र नक्षे यांच्या सहकार्याने पार पडला.

## सोलापूरचे श्री संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ कार्यान्वित; कार्यालयास प्रतिमा भेट



**सोलापूर/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य इतर मागास वर्गीय वित्त आणि विकास महामंडळामार्फत श्री संत नरहरी आर्थिक विकास महामंडळ कार्यालय कार्यान्वित झालेले आहे. या कार्यालयास दिनांक १० ऑक्टोबर रोजी सोनार समाज संस्था सोलापूर च्या पदाधिकाऱ्यांनी भेट देऊन जिल्हा व्यवस्थापक श्रीमती वृषाली लहारे मॅडम यांना संस्थेच्या सदस्या सौ. चित्रा पोतदार यांनी शाल, पुष्पगुछ देऊन सत्कार केला आणि श्री. संत नरहरी महाराजांची प्रतिमा महामंडळाच्या कार्यालयास भेट दिली. तसेच कार्यालयातील इतर कर्मचारी सर्वश्री अभिषेक लाड, अमित येरगुंटला व कृष्णा यांना संस्थेचे अग्रणी प्रवर्तक अनुक्रमे सर्वश्री मोहराव मंद्रूपकर, संजयजी मैंदर्गीकर व संतोषशेठ कळमणकर यांनी पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला.यावेळी संस्थेचे अध्यक्ष वसंत पोतदार, उपाध्यक्ष विजयकुमार पोतदार, सचिव दत्तगुरु वेदपाठक उपस्थित होते.

या प्रसंगी श्रीमती लहारे मॅडम म्हणाले की, या महामंडळामार्फत सोनार समाजातील घटकासाठी व्यापार, उद्योग, शेतीपूरक व्यवसाय तसेच इतर व्यावसायिक, महिला बचत गट व उच्च शिक्षणासाठी विविध कर्ज योजना, उपलब्ध आहेत. या महामंडळाच्या योजनेचा लाभ जास्तीतजास्त सोनार समाजातील लाभार्थ्यांनी घ्यावा त्या दृष्टीने आपण या योजनांची माहिती गरजू पर्यंत पोहोचवावी. याद्वारे अग्रणी प्रवर्तक श्री मोहनराव मंद्रूपकर यांनी समस्त समाज बांधवाना नम्रपणे विनंती वजा आवाहन केले आहे की, श्री.संत नरहरी आर्थिक विकास महामंडळाचे कार्यालय महाराष्ट्रातील ३६ जिल्ह्यात कार्यान्वित झालेल्या आहेत. तेंव्हा प्रत्येक जिल्ह्यातील सोनार समाज संस्था, संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी, नेते मंडळी, सामाजिक कार्यकर्ते आदिनी नव्याने कार्यान्वित झालेल्या महामंडळ कार्यालयास भेट देऊन माहिती घ्यावी कारण या योजनांची प्रसार व प्रचार प्रभाविपणे करण्याची जबाबदारी आपणा सर्वांचीच आहे.आणि संत नरहरी महाराजांची प्रतिमा नव्याने कार्यान्वित झालेल्या महामंडळाच्या कार्यालयास भेट द्यावी अशी त्यांनी विनंती केली आहे.

## दयानंद विज्ञान महाविद्यालयातील गांधी विचार परीक्षेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**लातूर/प्रतिनिधी** : येथील दयानंद शिक्षण संस्था संचलित,दयानंद विज्ञान महाविद्यालय व गांधी रिसर्च फाऊंडेशन,जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने दि.१० ऑक्टोंबर २०२५ रोजी गांधी विचार संस्कार परीक्षा संपन्न झाली.महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांच्या मार्गदर्शनाखाली परीक्षा समन्वयक डॉ.नंदिनी कोरडे,प्रा.राहुल जाधव व ग्रंथपाल प्रा.किरण भिसे यांनी परीक्षेचे उत्तमरित्या नियोजन केले. सदरील परीक्षेस एकूण ४४ विद्यार्थी व प्राध्यापकांनी नाव नोंदणी केलेली होती,त्यापैकी एकूण २८ विद्यार्थी व प्राध्यापकांनी परीक्षा दिली.डॉ.नंदिनी कोरडे,प्रा.राहुल जाधव व ग्रंथपाल प्रा.किरण भिसे यांनी पर्यवेक्षणाचे कार्य केले.

महाराष्ट्र शासनाचे परिपत्रक क्रमांक २०१४/(२६/१४) एसडी -६ शालेय शिक्षण विभाग मंत्रालय,मुंबई दि.१२ जून २०१४ द्वारे सर्व शाळांनी गांधी रिसर्च फाऊंडेशन गांधी विचार संस्कार परीक्षेत अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावे अशी सूचना केलेली आहे.त्यानुसार गांधी विचारांचा समृद्ध वारसा पुढच्या पिढीकडे संक्रमित करणे आणि गांधीजींच्या रचनात्मक कार्यात कार्यक्रमाद्वारे अहिंसक समाज निर्माण करणे या उद्देशाने ही परीक्षा घेण्यात आली. गेल्या १८ वर्षात भारतात व अन्य देशात लाखांहून अधिक विद्यार्थ्यांनी,शिक्षकांनी आणि हजारो कैद्यांनी या परीक्षेद्वारे गांधी विचार समजून घेण्याचा प्रयत्न केलेला आहे.महाविद्यालयात घेण्यात आलेल्या या परीक्षेला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला.

## दयानंद कला महाविद्यालयातील समाजशास्त्र विभागाची संवेदना दिव्यांग पुनर्वसन केंद्रास भेट

**लातूर/प्रतिनिधी** : महाविद्यालयाच्या वर्ग खोल्यांच्या बाहेरील समाज आणि त्याचे प्रश्न विद्यार्थ्यांनी समजून घ्यावेत या दृष्टिकोनातून समाजशास्त्राच्या बी.ए. आणि एम. ए. शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांनी लातूर मधील संवेदना या दिव्यांग पुनर्वसन केंद्राला भेट दिली.

५५ दिव्यांग विद्यार्थी जेथे आयुष्यात उभे राहण्याचे शिक्षण घेतात, मतिमंद किंवा सेरेब्रल पारसी आजार झालेल्या आपल्या मुलांना आई-वडील सांभाळून कंटाळतात, तेथे समाजातील अशा अनेक मुलांचा आधार बनलेले संवेदना केंद्र विद्यार्थ्यांनी अनुभवले.

या केंद्राच्या संचालक श्रीमती दीपाताई सुरेश पाटील यांनी अशा विद्यार्थ्यांसाठी आपले सर्वस्व ओतले आहे.

बौद्धिक वाढ न झालेले, मानसिक आजारी, मणक्याचे आजार झालेले अशा कितीतरी विकलांग छोट्या मुलांचे मुळाक्षरे शिकणे, कौशल्य शिकणे, तांत्रिक प्रशिक्षण घेणे, नाटक बसवणे हे सर्व उपक्रम पाहिल्यानंतर सर्वात महत्त्वाचा विचार मनात आला तो म्हणजे, दिव्यांगावर मात करून ही मुले शिक्षण घेऊ शकतात तर आम्ही का नाही?

रक्ताच्या नात्यात विवाह झाल्यामुळे उद्भवणारे असंख्य आजार,त्यातून उद्भवणारी विकलांग संतती आणि त्यातून उद्भवणारे आयुष्यभराचे प्रश्न टाळायचे असतील तर रक्ताच्या नात्यात विवाह करू नये यासाठी दीपाताई आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

समाजशास्त्र विभागातील ५० विद्यार्थ्यांनी या उपक्रमात सहभाग घेतला. अनेक विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारून आपल्या शंकांचे समाधान करून घेतले. हा उपक्रम प्राचार्य डॉ. शिवाजी गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली समाजशास्त्र विभाग प्रमुख आणि उपप्राचार्य डॉ. अंजली जोशी यांच्या संकल्पनेतून तसेच प्रा.भागवत बोकडे, प्रा ज्योती कदम, प्रा व्यंकट पांचाळ यांच्या सहकार्यातून प्रत्यक्षात आला.



समाजशास्त्र विभागातील तीन दिव्यांग विद्यार्थ्यांनाही त्यांच्या जीवनाबद्दल दीपाताई पाटील यांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी संवेदना प्रकल्पातर्फे दिले जाणारे आयटीआय चे प्रशिक्षण, त्यांनी तयार केलेल्या वस्तू, दिवाळीसाठी तयार केलेले आकाश कंदील आणि पणत्या हे सर्व अचंबित करणारे होते. संवेदना प्रकल्पाचे वैशिष्ट्य हे आहे की, येथील सर्व मुले दिव्यांग असूनही त्यांच्या चेहऱ्यावर आनंद आणि हास्य दिसत होते. हेच संवेदना पुनर्वसन केंद्राचे यश आहे. या उपक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. दिलीप नागरगोजे, पर्यवेक्षक डॉ प्रशांत दीक्षित, राजू मोरे,सेविका नंदिनी जाधव तसेच श्री गिरबने यांचे सहकार्य लाभले.

दयानंद कला महाविद्यालयाच्या समाजशास्त्र विभागाने संवेदना प्रकल्पातील दिव्यांग विद्यार्थ्यांना रजिस्टर भेट दिले. तसेच काही विद्यार्थ्यांनीही भेटवस्तू दिल्या.

## मध्य रेल्वे दक्षता पथकाकडून गुन्हेगारांवर कठोर कारवाई

**मुंबई/प्रतिनिधी** : मध्य रेल्वे दक्षता पथकाने तिकिटांचे हस्तांतरण, दलालीच्या कृती आणि बनावट ओळखपत्रे आणि बनावट तिकिटांवर प्रवास यासारख्या बेकायदेशीर तिकिटे खरेदी करण्याच्या पद्धतींवर सतत लक्ष ठेवले आहे. जानेवारी २०२५ ते मे २०२५ पर्यंत, मध्य रेल्वे वाहतूक दक्षता पथकाने अशा गैरप्रकारांना आळा घालण्यासाठी विविध ठिकाणी आठ प्रतिबंधात्मक तपासणी केल्या.

**या तपासणीचे तपशील खालीलप्रमाणे आहेत:**

फेब्रुवारी २०२५ मध्ये

अंबरनाथ (०३.०२.२०२५): सॉफ्टवेअरच्या माध्यमातून बेकायदेशीर ई-तिकीट विक्री उघडकीस आली; ८ तिकीटांची एकूण किंमत रु.१२०००/- आणि १३ खठउढ्ड आयडी जप्त करण्यात आले. ऋखठ नोंदवली असून सुप्रीम कोर्टाच्या मार्गदर्शनानुसार प्रकरण बंद करण्यात आले.

कोल्हापूर (१८.०२.२०२५): ४ तिकीट दलालांना रु. २५,५५७/- किंमतीच्या ४ तिकीटांसह अटक. संबंधित कायद्यांतर्गत प्रकरण नोंदवले.

मार्च २०२५ मध्ये

पुणे (०४.०३.२०२५): डेक्कन जिमखाना झठड येथे ३ तिकीट दलालांना रु १०.५२०/- किंमतीच्या ३ गउठ तिकीटांसह पकडले. कायदेशीर कारवाईसाठी ठझ्रऋ कडे सुपूर्द करण्यात आले.

* सिस्टमचा गैरवापर (२४.०३.२०२५): रिझर्वेशन क्लर्कने वैयक्तिक फायद्यासाठी तिकीट प्रिंट न करता सिस्टममध्ये जारी केले. मोठी चार्जशीट जारी करण्यात आली.

एप्रिल २०२५ मध्ये

* ट्रेन क्र. ११०५५ मध्ये दोन प्रवाशांना खोट्या ओळखपत्र आणि हस्तांतरित तिकीटांसह प्रवास करताना आढळले. दोघांनाही रेल्वे नियमांनुसार दंड करण्यात आला.

मे २०२५ मध्ये

रेल्वे कर्मचारी नसलेले दोघेजण प्रिव्हिलेज पासचा वापर करून बुक केलेल्या प्रवासी आरक्षण केंद्रातील तिकीटांसह ट्रेन क्र. १२७४१ मध्ये प्रवास करताना पकडण्यात आले. दोघांनाही रु. १०,९९०/- दंड देण्यात आला. पुढील चौकशी सुरू आहे.

* मलकापुर (२२.०५.२०२५): मोठ्या प्रमाणावर तिकीट दलालीची साखळी उघडकीस आली; २ व्यक्तींना रु १०.०९ लाख किंमतीच्या १८२ गउठ तिकीटांसह अटक करण्यात आली. दलाल, रिझर्वेशन क्लर्क आणि रेल्वे सुरक्षा दल निरिक्षक (खझ्रऋ) यांच्यात बेकायदेशीर संबंध आढळले. यानुसार मोठ्या व लहान प्रमाणावर चार्जशीट जारी करण्यात आल्या.

मध्य रेल्वेची चौकशी पथक रेल्वे तिकीट व्यवहारांमध्ये पारदर्शकता, प्रामाणिकपणा आणि न्याय्यतेसाठी कटिबद्ध आहे. खऱ्या प्रवाशांच्या हितासाठी तिकीट दलाली आणि बेकायदेशीर तिकीट व्यवहार संपविण्यासाठी सतत तपासणी आणि कठोर अंमलबजावणी केली जात आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.
शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९



## ठाकरेनगर येथील नवरात्र महोत्सवाची धार्मिक कार्यक्रमाने सांगता: गरजू रुग्णांसाठी शिबिर, महिलांसाठी खेळ पैठणीचा यासह विविध कार्यक्रमांना मोठा प्रतिसाद



धाराशिव(प्रतिनिधी)-धाराशिव शहरातील बाळासाहेब ठाकरेनगर येथील ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीच्या वतीने आयोजित नवरात्र उत्सवाची धार्मिक कार्यक्रमाने सांगता झाली. नवरात्रोत्सव कालावधीत घटस्थापनेपासून कोजागिरी पौर्णिमेपर्यंत विविध सामाजिक, सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या सर्व कार्यक्रमांना भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

नवरात्रोत्सव समितीच्या वतीने विविध आजारांवरील रुग्णांकरिता बुधवार, दि. २४ सप्टेंबर ते मंगळवार ३० सप्टेंबर या कालावधीत आयोजित केलेल्या विशेष शिबिरात ॲक्युप्रेशर, सुजोक उपचार, आणि नैसर्गिक उपचार पद्धतीचा सहा दिवसांचा कोर्स जोधपूर येथील ॲक्युप्रेशर, नॅचरोपॅथी रिसर्च ट्रिटमेन्ट या संस्थेमार्फत आयोजित करण्यात आला. या शिबिरात तब्बल सातशे जणांनी नोंदणी करून सहभाग नोंदवला. ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीचे मार्गदर्शक प्रशांत (बापू) साळुंके यांनी धाराशिवकरांसाठी पहिल्यांदाच ही उपचार पद्धती खास नवरात्र उत्सवाच्या काळात उपलब्ध करुन दिली होती. यावेळी नवरात्रोत्सव समितीच्या सर्व सदस्य तसेच ठाकरेनगर व परिसरातील भविक, महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

त्याचबरोबर महिलांसाठी ‘खेळ पैठणीचा’ हा विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यामध्ये महिलांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवला. त्याचबरोबर महिला, मुलींसाठी विविध स्पर्धांचेही आयोजन करण्यात आले होते. त्याचबरोबर यंदाच्या महोत्सवात हरियाणवी कलाकारांच्या चित्तथरारक कसरती आणि नृत्याच्या कार्यक्रमाने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

तसेच पौर्णिमेनिमित्त शिवसेनेचे ज्येष्ठ नेते तथा माजी नगराध्यक्ष दत्तात्रय बंडगर यांच्या हस्ते बाळासाहेब ठाकरे नगर येथील नवरात्र महोत्सवाच्या छबिना मिरवणुकीचा विधिवत पूजा करून शुभारंभ करण्यात आला.

यावेळी नवरात्रोत्सवाचे आयोजक, संस्थापक, प्रशांत साळुंके, येरमाळा येथील येडाई देवस्थानाचे अध्यक्ष बापूसाहेब बेद्रे, येडाई मंदिराचे पुजारी आबा आगलावे, परमेश्वर मेंगले व परिसरातील भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते. ठाकरेनगर नवरात्रोत्सव समितीचे मार्गदर्शक प्रशांत (बापू) साळुंके यांनी यावर्षीही नवरात्र महोत्सव समितीमध्ये महिलांना संधी देवून नारीशक्तीचा सन्मान करण्याची परंपरा जोपासली. त्यांच्या या कार्याचे सर्व स्तरातून स्वागत होत आहे.

# राष्ट्रीय महामार्ग कामात दिरंगाई, डॉ. रामलिंग पुराणे यांचे मंगळवारपासून आमरण उपोषण आंदोलन

मुरूम (प्रतिनिधी)- राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब मुरूम मोड ते मुरूम -आलूर -बोळेगाव मार्गे अक्कलकोटला जोडणारा रस्ता काम घिसाड घाईने उरकण्यात आले त्यामुळे रस्त्यावर ठिठिकाणी खड्डे पडले आहेत त्याचबरोबर आलूर -बोळेगाव रस्ता काम अद्याप प्रलंबित असल्याने वाहतुकीस, नागीरकांना त्रासाना सामोरे जावे लागत आहे, याबाबत समाजसेवक तथा बसव प्रतिष्ठान अध्यक्ष डॉ. रामलिंग पुराणे यांनी १४ सप्टेंबर रोजी सदरील प्रलंबित रस्त्यावरील पाणी साचलेल्या खड्ड्यात बसून लाक्षणिक आंदोलन करीत संबंधित विभागाला रस्ता काम तात्काळ पूर्ण करावी अशा मागणीचे पत्र दि. १८. ०९. २०२५ व दि. ०६ ऑक्टोबर रोजी ईमेलच्या माध्यमातून केली होती अन्यथा दि. १४ ऑक्टोबर पासून आमरण उपोषण आंदोलन छेडण्याचा ईशारा पत्रात दिला होता. सदरील निवेनाबाबत संबंधित विभागानी दखल घेऊन दि. ०८ ऑक्टोबर रोजी डॉ. पुराणे यांना पत्र पाठवून उडवा उडविचे उत्तरे देत वेळ मारून नेण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येते, सदरील पत्रात १३०० मीटर अंतराचा रस्त्याबाबत काही शेतकऱ्यांनी मावेजासाठी जनहितयाचिका दाखल केली असून न्याय प्रविष्ट विषय आहे तरीही आम्ही काम पूर्ण करण्यास तयार आहोत मात्र पोलीस प्रशासनास पोलीस बंदोबस्तसाठी मागणी केली असून अद्याप बंदोबस्त देण्यात आली नाही असे पत्रात नमूद आहे. डॉ. पुराणे मात्र आपल्या आंदोलनावर ठाम असून दि. ०८ रोजीच्या संबंधित विभागाच्या पत्राला दि. ०९ रोजी प्रतिउत्तर देऊन आमची मागणी ठिकठिकाणी रस्त्यावरील खड्डे व आलूर-बोळेगाव रस्ता काम तात्काळ पूर्ण करण्याबाबत असून आपल्या स्तरातून वेळ मारून नेत असल्याचे स्पष्ट दिसून येत आहे आपल्या ह्या दिरंगाई मुळे नागरिकांना त्रासाला सामोरे जावे लागत आहे आणि आपल्या विभागाला किंवा संबंधित गुत्तेदाराला नागरिकांच्या होणाऱ्या त्रासाचे काही देणेघेणे नाही असे दिसून येते, त्यामुळे आम्ही आपणास एक महिन्याची कालावधी दिली होती मात्र आपल्याकडून ठोस पावले उचलण्यात आली नाहीत अशा अशायाचा पत्र पाठवून

१४ ऑक्टोबरला बेमुदत आमरण उपोषण आंदोलनास सुरुवात होईल आणि त्यास शासन, प्रशासन, संबंधित विभाग, गुत्तेदार जबाबदार राहील याची नोंद घ्यावी असा इशारा पत्रात देण्यात आला आहे.

२०२३ मध्ये पार पडलेल्या राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ५४८ ब रस्ता काम घिसाड घाईने उरकण्यात आले आहे, ठिकठिकाणी रस्त्यावर खड्डे पडले आहेत तर आलूर -बोळेगाव १३०० मिटरचा रस्ता काम मात्र अद्याप करण्यात आला नाही, एकीकडे विषय न्याय प्रविष्ट आहे असे म्हणतात तर दुसरीकडे पोलिस बंदोबस्तात काम करू असे म्हणतात, मुळात विषय न्याय प्रविष्ट जर असेल तर मा. न्यायालयाने काम करू नका असे स्थगिती दिली आहे का? सदर पत्रामध्ये रीट पिटीशन १३२६९/२०२२ यामध्ये स्थगिती आदेश दिल्याचे मला कार्यकारी अभियंता पत्र क्रमांक २६९३ च्या पत्रानव्ये कळविले नाही, व तसे ठोस कागदपत्रे ही उपलब्ध नसल्याचे दिसून येते, फक्त हा विषय समोर ठेऊन कोठेतरी वेळ मारून नेण्याचा प्रयत्न दिसून येत आहे आणि त्यांच्या ह्या दिरंगाई मुळे नागरिकांना त्रास सोसावे लागत आहे, या रस्त्यावरून श्री स्वामी समर्थ अक्कलकोटला जा ये करणारे प्रवाशी, शालेय विद्यार्थी, शेतकरी, व्यापारी सह शासकीय वाहनांना याच रस्त्याचा वापर करावा लागतो,यदाकदाचित यां रस्त्यावर भीषण अपघात घडला तर याला जबाबदार कोण? शासन, प्रशासन, संबंधित विभाग की गुत्तेदार? विषय न्यायालयात असले तर आम्हीही सन्मानपूर्वक न्यायांची प्रतीक्षा करू मात्र न्यायालयाने संबंधित रस्ता काम न्यायालयीन कामकाज पूर्ण पडे पर्यंत थांबवावे असे आदेश दिले असेल तर त्याचा आम्ही पालन करू पण सद्या न्यायालयामध्ये कुठेही स्थिगिती आदेश असल्याचे दिसून येत नाही त्यामुळे नागरिकांवर होणाऱ्या अन्यायला न्याय केंव्हा मिळणार..?व त्याचबरोबर मावेजा साठी मागणी करणाऱ्या शेतकरी बांधवाना कार्यकारी अभियंता सोलापूर यांच्याकडून पैसे कधी मिळणार आणि रस्ता कधी होणार हा प्रश्न अद्याप गुलदस्त्यात आहे.

**–डॉ. रामलिंग पुराणे,**
**समाजसेवक तथा अध्यक्ष बसव प्रतिष्ठान**



# शासनाचे सकारात्मक पाऊल
## १३ ऑक्टोबर रोजी छत्रपती संभाजीनगर येथे ‘भूमि लोक अदालत’

धाराशिव (जिमाका) छत्रपती संभाजीनगर - भूमि अभिलेख विभागात उप अधीक्षक भूमि अभिलेख,जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख व उपसंचालक भूमि अभिलेख यांच्या स्तरावर अर्धन्यायीक स्वरूपाचे कामकाज चालते.तथापि,विविध टप्प्यावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्यामुळे संबंधितांना न्यायदानास विलंब होत आहे. याच पार्श्वभूमीवर महसूल मंत्री तसेच जमाबंदी आयुक्त आणि संचालक, भूमि अभिलेख महाराष्ट्र राज्य,पुणे यांनी २० जून २०२५ रोजी परिपत्रक जारी करून प्रलंबित अर्धन्यायीक प्रकरणांचा जलदगतीने निपटारा करण्यासाठी ‘भूमि लोक अदालत’ आयोजित करण्याचे निर्देश दिले आहेत.या उपक्रमाचा उद्देश जनतेला जलद गतीने न्याय मिळवून देणे, समाजामध्ये सलोखा व सामंजस्य निर्माण करणे आणि सौहार्दपूर्ण वातावरण निर्मिती करणे हा आहे.

शासनाने उचललेले हे पाऊल निश्चितच सकारात्मक ठरणार आहे.त्याचाच एक भाग म्हणून उपसंचालक भूमि अभिलेख,छत्रपती संभाजीनगर विभाग, छत्रपती संभाजीनगर यांच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या अर्धन्यायीक प्रकरणांच्या निपटाऱ्यासाठी भूमि लोक अदालतीचे आयोजन १३ ऑक्टोबर २०२५ रोजी करण्यात आले आहे.या लोक अदालतीमध्ये सर्व संबंधित पक्षकार - वादी/प्रतिवादी,अपीलदार/जावदार,त्यांचे विधीज्ञ तसेच नागरिकांनी उपस्थित राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या अदालतीत प्रकरणे तडजोडीने निकाली काढण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे.

अपीलमधील दोन्ही पक्षकार स्वतः अथवा त्यांच्या वकिलामार्फत तडजोडीसाठी अर्ज दाखल करू शकतात. प्रलंबित अर्धन्यायीक स्वरूपाची प्रकरणे मोठ्या प्रमाणावर निकाली लावण्यासाठी या लोक अदालतीत सहभागी होऊन आवश्यक सहकार्य करावे,असे आवाहन करण्यात आले आहे.

भूमी अभिलेख अदालत ही भूमि अभिलेख प्रशिक्षण प्रबोधिनी,छत्रपती संभाजीनगर दमडी महल,पंचायत समिती शेजारी,गणेश कॉलनी,छत्रपती संभाजीनगर येथे १३ ऑक्टोबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजतापासून सुरु होणार आहे. उपसंचालक भूमि अभिलेख,छत्रपती संभाजीनगर प्रदेश यांनी नागरिकांना मोठ्या प्रमाणावर सहभागी होऊन या ‘भूमि लोक अदालती’ ला यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे.

## ७९ कारवाया करुन ६३,५०० ‘तडजोड शुल्क’वसुल

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर वाहतुक शाखा व संबंधीत पोलीस ठाण्यांनी महत्त्वाच्या रस्त्यांवर दि.०९ ऑक्टोंबर रोजी मोटार वाहन कायदा-नियम भंग प्रकरणी एकुण ७९ कारवाया करुन ६३,५०० ‘तडजोड शुल्क’वसुल केले आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५) २२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

# धाराशिव जिल्हयाकरीता नविन २४ सबस्टेशनला लवकरच मंजुरी मिळणार - खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर
## ए.डी.बी. च्या माध्यमातून २० सबस्टेशनची क्षमतावाढ व मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेंतर्गत २२ सबस्टेशनची क्षमतावाढ होणार



धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव जिल्हयासाठी २४ नविन सबस्टेशनला आशियाई विकास बँकेच्या माध्यमातून जिल्हयाची वाढती विज मागणी लक्षात घेता, शेतकऱ्यांना सुरळीत विद्युत पुरवठा करणेकरीता खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांच्या विशेष प्रयत्नातून आशियाई विकास बँकेने २४ नविन ३३/११ के. व्ही सबस्टेशन उभारणीकरीता आशियाई विकास बँकेकडे प्रस्ताव सादर केले असल्याचे कळविले आहे.

वारंवार विज पुरवठा खंडीत होणे, अनियमीत विद्युत पुरवठा, लोड शेडींग, या समस्यामुळे शेतकरी त्रस्त झाले असून ऐन हंगामात शेतकऱ्यांना मोठया प्रमाणात विद्युत तुटवडयाच्या समस्येचा सामना करावा लागत असल्याचे लक्षात घेवून सातत्याने व सुरळीतपणे विद्युत पुरवठा करणेकरीता खा. ओमप्रकाश राजेनिंबाळकर यांनी आर. डी. एस.एस. व आशियाई विकास बँक तसेच मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी या विविध योजनेंतर्गत विद्युत पुरवठा सुरळीत करणेकरीता प्रयत्न केले आहेत.

याचाच भाग म्हणून आशियाई विकास बँकेच्या माध्यमातून जिल्हयात २४ नविन सबस्टेशन करीता धाराशिव तालुक्यातील पळसप, दारफळ, भडाचीवाडी वरुडा चौक, गोगाव -करजखेडा तसेच तुळजापुर तालुक्यातील ढेकरी, वडगाव काटी, नविन तामलवाडी, कार्ला खंडाळा लोहारा तालुक्यातील तुगाव, वडगाव (गांजा) ,खेड, उमरगा तालुक्यातील नाईचाकुर, कुन्हाळी, कराळी, भुम तालुक्यातील गिरवली फाटा, वंजारवाडी, नळीवडगाव, कळंब तालुक्यातील नायगाव, खोंदला चोराखळी परांडा तालुक्यातील खासापुरी, ताकमोडवाडी, जवळा येथे नविन सबस्टेशन होणार आहेत

तसेच सध्यस्थितीतील २० सबस्टेशनची क्षमतावाढ करुन त्या ठिकाणी अतिरीक्त, ५ एम.व्ही.ए. ट्रान्सफार्मरच्या माध्यमातून तुळजापुर तालुक्यातील फुलवाडी (१० एम.व्ही.ए) , वसंतनगर, बारुळ, होर्टी, उमरगा तालुक्यातील माडज येथे तसेच भुम तालुक्यातील आंबी, वाशी तालुक्यातील पारा, परांडा तालुक्यातील जवळा, पिंपळगाव, सोनारी सुकटा वरदवाडी, कळंब तालुक्यातील ढोराळा, डिकसळ, रायगव्हाण धाराशिव तालुक्यातील रुई भर तडवळा, काकडे प्लॉट येथे अतिरिक्त ५ एम.व्ही.ए. पावर ट्रान्सफार्मर बसवण्यात येणार आहेत.

मुख्यमंत्री सौरकृषी वाहिनी योजनेंतर्गत जिल्हयात २२ ठिकाणी तुळजापुर विभागतील मंगरुळ मुरुम गुंजोटी, कानेगाव, होळी, माळुंब्रा काटी धाराशिव विभागातील वाशी, बावी, भुम. एम.आय.डी.सी., आवाड शिरपुरा, पाडोळी, मंगरुळ, भोगजी, मस्सा हसेगाव, येडशी, खेड, देवळाली, मोहा या ठिकाणी अतिरिक्त ५ एम.व्ही. ए. पावर ट्रान्सफार्मर बसविणेकरीता प्रस्ताव सादर केले आहेत.


**Name of change Declaration**

Here in this advertise i am declaring that i have change My Name which was : **QURESHI RIZVANA BEGUM SAMAD**
TO: **RIZVANA IRFAN QURESHI**
Hence for this Declaration i will be known by this name and will use RIZVANA IRFAN QURESHI in future the same will used by my family husband /wife, children and relative.
OLD NAME :- **QURESHI RIZVANA BEGUM SAMAD**
NEW NAME :- **RIZVANA IRFAN QURESHI**
Address - KURESHI GALLI Naldurg Taluka Tuljapur Dist Osmanabad. -413602
Adhar n.-837035895117 Mob.9511823174


## परदेशात शिक्षणाची सुवर्णसंधी : National Overseas Scholarship 2025-26 अर्ज प्रक्रिया सुरु

धाराशिव, (जिमाका) सामाजिक न्याय व अधिकारिता मंत्रालय,नवी दिल्ली यांच्या वतीने केंद्र सरकार पुरस्कृत National Overseas Scholarship (NOS) 2025 -26 करिता अर्ज प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या योजनेतून पात्र विद्यार्थ्यांना परदेशात उच्च शिक्षण घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.या शिष्यवृत्तीकरिता अर्ज छजड पोर्टल (https://nosmsje.gov.in) वरून सादर करता येतील.रिक्त जागा भरण्यासाठी दुसऱ्या फेरीकरिता अर्ज स्वीकृतीची मुदत २४ ऑक्टोबर २०२५ पर्यंत निश्चित केली आहे. याबाबत सविस्तर माहिती केंद्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर (www.nosmsje.gov.in) उपलब्ध आहे.अर्ज करण्याची अंतिम मुदत २४ ऑक्टोबर २०२५ असून, इच्छुक विद्यार्थ्यांनी ही संधी गमावू नये,असे आवाहन श्री.सचिन कवले, सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, धाराशिव यांनी केले आहे.


हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२

Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649